आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २६ जून २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २९२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 26 JUNE 2024 | adhunikkesari.com | ● YEAR-03 ● ISSUE-292 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# 'श्री'च्या दर्शनासाठी जनसागर उसळला; लाखो भाविकांनी घेतले राजुरेश्वराचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** जालना जिल्ह्याचे ग्रामदैवत, मराठवाड्यातील प्रसिद्ध गणपती संस्थान श्रीक्षेत्र राजूर येथील राजुरेश्वराच्या दर्शनासाठी अंगारकी चतुर्थी निमित्ताने भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. जिल्ह्यासह मराठवाड्यातील विविध ठिकाणांहून आलेल्या भक्तांची रीघ लागली होती. मागील आठरा महिन्यापासून अंगारकी चतुर्थीचा योग आला नसल्याने भाविकांना'श्री'च्या दर्शनाची ओढ लागली होती. भाविकांची ती इच्छा आज पूर्ण झाली.आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून लाखों भाविकांनी राजुरेश्वराची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले.



सर्वप्रथम आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी कृष्णाकांत पांचाळ,उपजिल्हाधिकारी दयानंद जगताप,तहसीलदार संतोष बनकर आदी मान्यवरांच्या हस्ते राजुरेश्वराची पूजा व महाआरती करण्यात आली.यावेळी गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर सुधाकरराव दानवे,सरपंच प्रतिभा भुजंग,माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, गणपती संस्थान विस्वस्थ गणेश मामा साबळे,नारायण पुंगळे,कार्यालयीन अधीक्षक प्रशांत दानवे, भगवानराव नागवे,श्रीरामपंच पुंगळे,ग्रामसेवक प्रमोद पुंगळे,ग्रामपंचायत सदस्य पंढरीनाथ करपे,आप्पासाहेब पुंगळे,राहुल दरख,विनोद डवले, मोहिनीराज मापारी यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कन्नड तालुक्यातील वासडी येथील माणिक दगडू नागरे व सुरेखा नागरे या दाम्पत्यास अंगारकी चतुर्थी निमित्ताने प्रथम पूजेचा मान मिळाला. गणपती संस्थांच्या वतीने नागरे कुटुंबीयांचा राजुरेश्वराची प्रतिमा, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांचा पावसापासून बचाव व्हावा म्हणून गणपती संस्थांच्या वतीने मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती.श्रीच्या सेवेकरींनी सेवेच्या माध्यमातून मोलाचे योगदान दिले. सामाजिक कार्यकर्ते आणि व्यापारी बांधवांनी भाविकांसाठी चहापाणी व फराळाची व्यवस्था केली होती.खाजगी व शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आरोग्य सेवा पुरवली. दक्षता म्हणून आरोग्य विभागाकडून रुग्णवाहिकांही सज्ज करून ठेवल्या होत्या. भाविकांची गर्दी वाढल्याने दुतर्फा रस्त्यांच्याकडेला दुचाकी, चार चाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती.

# कर्ज नाकारणाऱ्या बँकांवर गुन्हे दाखल करु

## देवेंद्र फडणवीस : शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला पाहिजे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :**शेतकऱ्यांना सीबीलची अट लागू करु नये. तसेच सीबीलचे कारण दाखवून त्यांना बँकांनी जर कर्ज नाकारले तर ते खपवून घेतले जाणार नसल्याचे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. सीबीलचे कारण सांगून बँकांनी कर्ज नाकारले तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करु, असा इशाराही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी दिला. गुन्हे दाखल केल्यावर आमच्याकडे येऊ नका असेही फडणवीस म्हणाले. कोणत्याही बँकांना शेतकऱ्याला कर्ज नाकारता येणार नसल्याचे फडणवीस म्हणाले. सीबीलचे कारण सांगून शेतकऱ्यांना कर्ज नाकारु नये असेही ते म्हणाले. तसे जर झाले तर एफआयआर दाखल करण्याचा इशारा फडणवीसांनी दिला आहे. याबाबतची माहिती सर्व बँकांना द्यावी, असेही ते म्हणाले. शेतकऱ्यांना कर्ज मिळताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला असल्याचेही फडणवीस म्हणाले. खरीप पूर्व बैठकीत बियाणे खतांची उपलब्धता याबाबतची चर्चा झाली आहे. शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला पाहिजे, याबाबातचा आढावा आजच्या बैठकीत आम्ही घेतला. खरीपाच्या हंगामात शेतकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये याची काळजी घेतल्याचे फडणवीस म्हणाले.दरम्यान, डीपीए खतांचा वापर कमी झाला पाहिजे आणि नॅनो खतांचा वापर वाढला पाहिजे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. दरम्यान, जास्तीत जास्त शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला पाहिजे असेही फडणवीस म्हणाले. तसेच रासायनिक खतांचे लिकिंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# भगवानगडाला चार हेक्टर जमीन देण्यास मंजुरी!

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** श्रीक्षेत्र भगवानगडाच्या विविध विकास कामांसाठी भगवानगड ट्रस्टला लागून असलेली वनविभागाची चार हेक्टर जमीन भगवानगडाला हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून वन विभागाचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या माध्यमातून केंद्रीय वन विभागाकडे पाठवला होता. त्यास केंद्रीय वन विभागाने मान्यता दिली आहे. भगवान गडाचे महंत न्यायाचार्य, ह. भ. प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांनी सदर जमीन वन विभागाकडून हस्तांतरित करून भगवानगडाच्या विकास कार्यासाठी देण्यात यावी, याबाबत धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून राज्य शासनास व केंद्र शासनास विनंती केली होती. या जमिनीवर रुग्णालय, सामाजिक प्रशिक्षण केंद्र, यात्री निवास, वाहन तळ इत्यादी कामे करणे प्रस्तावित आहे.

# मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना भोवले

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** वैनगंगा नदीवरील गोसेखुर्द धरणाच्या बॅकवॉटरवर जागतिक दर्जाचे जल पर्यटन प्रकल्प होत आहे. त्याच्या भूमिपूजन समारंभाकरिता काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे भंडाऱ्यात आले होते. दरम्यान, भूमीपूजनाचा कार्यक्रम आटपून सभास्थळाकडं जात असताना जिल्हा परिषद चौकात युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना काळे झेंडे दाखवून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. याप्रकरणी युवक काँग्रेसच्या सहा पदाधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तर, सभास्थळी गोसेखुर्द प्रकल्प बाधित एका महिलेसह पाच जणांनी सभेदरम्यान नारेबाजी करीत मुख्यमंत्र्यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. अशा अकरा जणांविरुद्ध भंडारा पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भंडाऱ्यात काल 547 कोटींच्या विकासकामाच्या भूमिपूजन संपन्न झाले. यात 102 कोटीच्या खर्चातून होत असलेल्या जागतिक दर्जाचे जल पर्यटन प्रकल्पाचा देखील समावेश आहे. मात्र हा कार्यक्रम अनेक कारणांनी चर्चेत आला आहे. एकीकडे भूमिपूजनाच्या फलकावर जलसंपदा मंत्री आणि पर्यटनमंत्री यांचे नावच गायब असल्याचे आढळून आले. तर विरोधी पक्षातील अनेक नेते कार्यक्रमाला उपस्थित असताना महायुतीतील प्रमुख नेत्यांनाच आमंत्रण मिळाले नसल्याचे पुढे आले आहे. त्यामुळे या कार्यक्रमाने महायुतीत मतभेदाची दरी निर्माण केली आहे का असा प्रश्न सध्या निर्माण झाला आहे. कारण भाजप नेत्यांनी मुख्यमंत्र्यांच्या या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली होती. तर आता भंडाराचे माजी खासदार आणि भाजप नेते सुनील मेंढे यांनी भाजप नेत्यांना कार्यक्रमाचं निमंत्रणात नसल्याचा गंभीर आरोप केला आहे. एवढंच नाही तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनाही कार्यक्रमाचा निमंत्रण नव्हते. त्यामुळे महायुतीत समन्वयाचा अभाव दिसत असून समन्वय वाढवण्याची गरज असल्याचं मेंढे म्हणाले होते. दुसरीकडे भंडाऱ्यातील या भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला स्थानिकांचा विरोध होताना देखील बघायला मिळाले होते. गोशीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांना मागील दोन वर्षापासून मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. मात्र अद्याप भेट देत नसल्याचा आरोप करत प्रकल्पग्रस्तांनी कालच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमादरम्यान गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी आपल्या मागण्यांना घेऊन या प्रकल्पग्रस्तांनी मुख्यमंत्र्यांच्या समोर घोषणाबाजी सुरू केली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ त्यांना ताब्यात घेत पोलीस व्हॅनमध्ये कोंबून नेले.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


पाचवं पाऊल आहे रोज थोडा वेळ तरी ध्यान करणे. ध्यान अनेक प्रकारांनी केले जाते. त्यातील कोणताही एखाद्या प्रकारची माहिती करून रोज थोडा वेळ तरी ध्यान करा. त्यामुळे तणाव कमी होऊन मनःशांती मिळेल. सहावं पाऊल आहे सकारात्मक विचारांचं. जेव्हा आपण योग, प्राणायाम, ध्यान इ करायला लागू तेव्हा नकारात्मक विचार हळूहळू कमी व्हायला लागतील. आणि निराशेचा पेला उत्साहाने, सकारात्मक विचारांनी भरायला सुरुवात होईल. सातवं पाऊल आहे प्रार्थनेचं . प्रार्थनेने मन शांत आणि एकाग्र व्हायला मदत होते. ज्या परमेश्वराने आपल्याला हे सुंदर जग, आणि आयुष्य दिलं त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं म्हणजे प्रार्थना. स्वतःसह सर्वांच्या कल्याणाची इच्छा व्यक्त करणं म्हणजे प्रार्थना. सर्वांच्या कल्याणाची इच्छा व्यक्त करणाऱ्या या प्रार्थनेने लेखाचा शेवट करू या. सर्वे ऽपि सुखिनः सन्तु ! सर्वे सन्तु निरामयः ! सर्वे भद्राणी पश्यन्तु ! माकश्चित दुःख भागभवेत !! हे ईश्वरा, सर्वांना सुखी ठेव. सर्वांचं कल्याण होऊ दे. सर्वांना निरोगी राहू दे. सर्वांची मने शुद्ध आणि पवित्र राहू देत. कोणीही दुःखी असू नये. इतरांकडे केवळ देहभावातून न पाहता अंतःकरणातून, चैतन्यभावाने पाहण्याची दृष्टी दे. दुःखात असलेल्याला मदत करून, ज्ञान देऊन त्याची दुःखातून सुटका करण्याची प्रेरणा आम्हाला होऊ दे.




## हितगुज



पुष्प
९९वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## वसुंधरेची थोरवी!

संपूर्ण विश्वात फक्त भारतीयांनी पृथ्वीला, जन्मभूमीला, राष्ट्राला मातेच्या रूपात अनुभवले आहे. मातृऋणाची, कृतज्ञतेची अपार संवेदना भारतीय हृदयाचे वैभव आहे. आर्य द्रविड व कृषक संस्कृतीच्या त्रिवेणी संगमातून भारतीयांचे व्यक्तिमत्त्व विकसित झाले आहे. भारतीयांनी धरतीला आद्यशक्ती अथवा परमा प्रकृती, ब्रह्मशक्तीच्या रूपात अनुभवले आहे. पृथ्वी भारतीयांची सीता-माता आहे. अपार सहनशीलता, क्षमाशीलता, विराटता, उदारता धारण करणारी सीता माता धरती रामत्व अधिक उजळणारी आंतरिक ऊर्जा आहे. तिच्या आधाराने सर्व मूल्ये सप्राण होतात. सर्व आदर्श बलशाली बनतात. ही कष्ट, व्यथांचे भार उरी वाहणारी 'हिरण्यगभिर्णी' पृथ्वी कर्मनिष्ठा, श्रमनिष्ठेचे ज्वलंत उदाहरण आहे. तिचे ऐश्वर्य त्यागावर आधारलेले आहे. अशा पद्धतीने भारतीय शेतकर्यांनी जीवनाचा व्यापक, मूल्याधिष्ठित विचार भारतीय संस्कृती व परंपरेत रुजवला आहे. धरतीच्या स्थूल, भौतिक रूपाकारात, नश्वर व परिवर्तनशील ऋतुचक्रात या शेतकर्याने सूक्ष्म, चिन्मय, अविनश्वर शक्तीरूप अनुभवले. प्रतिभा आणि श्रम असे एकरूप होतात, तेव्हा कालजयी सर्जना शक्य बनते. शेतकरी द्रष्टाऋषी होता, तोवर तो भारताच्या नियतीचा खराखुरा संचालक होता. परंतु त्याचे द्रष्टेपण हरवले तेव्हा तो गुलाम, लाचार, अगतिक झाला. जीवनाचा ढासळलेला तोल सावरण्यासाठी शेती व अध्यात्म पुन्हा परस्परांशी जोडले गेले पाहिजेत, या महत् भूमिकेने सद्गुरू प. पू. मोरेदादांनी दिंडोरी प्रणीत श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्म सेवामार्गाची प्रतिष्ठापना केली आहे. भारताचा गौरव एक स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व असा आहे. कृषी जीवन व कृषक यांची आत्मसजग आत्मीयता या अस्तित्वाला विशिष्ट ओळख प्राप्त करून देत आली आहे. इंग्रजांनी वर्चस्व टिकवण्यासाठी ही ओळख पुसून काढण्याचे प्रयत्न सर्वतोपरी केले. त्यांनी भारतीय शेतीला अन्नपूर्णा राहू न देता नीळ, अफू, कापूस उत्पादित करणारी औद्योगिक भूमी बनवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. शेतकरी मजूर झाला. भांडवलवादी मूल्ये विचारप्रवाह महत्त्वाचे बनल्यावर अध्यात्म अनावश्यक वाटू लागले. आज ही चूक दीर्घकाळाने का होईना, पण उमजायला लागली आहे. भगवान श्री स्वामी समर्थ अक्कलकोटला अवतीर्ण झाले. पण राजवाडे, श्रीमंतांच्या महाली न जाता ते वटवृक्षाखाली थांबले. तेथे येणार्या प्रत्येक जनसामान्याला, शेतकर्याला त्यांनी कर्मातले अध्यात्म, अध्यात्मातले कर्म अनुभवण्याची गोडी लावली, ताकद दिली. त्यांनी गायीचे महत्त्व, आयुर्वेदाचे महत्त्व जनतेला पटवून दिले. ते गुराख्यांबरोबर रानी-वनी हिंडले. त्यांनी बसाप्पा तेल्यास अध्यात्माचा अधिकारी बनवले. त्यांनी गरीब माणसामध्ये अध्यात्माची श्रीमंती निर्माण करून त्यास श्रमाचा राजयोग शिकवला.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

गोरक्ष चौपदी अविनाश। अलक्ष लक्षे लक्षी पै॥ गोरक्षाच्या या ओळखीवर दत्तात्रेय उद्गरले, "गोरक्षा! अजून ऐक..



"मी वेदशास्त्र अगोचर। मी लोकत्रयाहूनी पर॥ मी नव्हेची गा निर्जर। यज्ञादी वर्ण नव्हे मी॥
मज नसे कुळ गोत्र याती। मज स्वर्ग ना अधोगती॥ मी ब्रह्मैव अरूपस्थिती। मी परमार्थ तत्व जाण पां॥
मी पर ना अपर। मी क्षर ना अक्षर॥ मी शब्द ना ओंकार। अकार उकार नव्हे मी॥ मी कृपण ना उदार। मी प्रकाश ना अंधकार॥ मित्र ना रोहिणीवर। चटवारश्रुंग व्हे मी॥ मी कर्ता ना अकर्ता। मी भोक्ता न आभोक्ता॥ मी सत्ता न असत्ता। आर्ता पाता नव्हे मी॥
मी जाणता न अजाण। मी सेव्य ना शरण॥ मी कारण ना अकारण। ज्ञान अज्ञान नव्हे पै॥ मी पाप ना पुण्य। मी कुरूप ना लावण्य॥
मी अल्प ना अगण्य। धन्याध्यन्य मी नव्हे॥ मी श्वेत ना सावळा। मी रक्त ना पिवळा॥ मी नीळ ना सुनीळा। रंगावेगळा असे मी॥
मी ब्रह्मचर्य ना गृहस्थ। मी वानप्रस्थ ना सन्यस्थ॥ मी स्वस्थ ना अस्वस्थ। वृत्तस्थ कुटस्थ नसे मी॥ मी नसे स्थावर जंगम। मज नसे क्रिया कर्म॥ वर्णाश्रम धर्माधर्म। अनामा नाम मज कैचे॥
मी खेचरी ना भूचरी। मी चाचरी ना अगोचरी॥ मी अलक्ष नव्हे निर्धारी। पवन मन नव्हे मी॥ जागृत स्वप्न सुषुप्ती तुर्या। हेही भेद भासती वाया॥ मी नसेची मच्छेंद्रतनया। छायामाया रहित मी॥
दत्तात्रेयांच्या या उत्तरावर गोरक्ष देहभान विसरले. त्या अवस्थेतच मच्छेंद्रनाथांनी गोरक्षांचा हात दत्तात्रेयांच्या हातात ठेवला. द्वैत नावालाही उरले नाही. केवळ सोहम भाव भरून राहीला. श्रीगोरक्षनाथ संकट मोचन स्तोत्र बाल योगी भये रूप लिए तब, आदिनाथ लियो अवतारों। ताहि समे सुख सिद्धन को भयो, नाती शिव गोरख नाम उचारो॥ भेष भगवन के करी विनती तब अनुपन शिला पे ज्ञान विचारो । को नही जानत है जग मे जती गोरखनाथ है नाम तुम्हारो ॥
सत्य युग मे भये कामधेनु गौ तब जती गोरखनाथ को भयो प्रचारों ।
आदिनाथ वरदान दियो तब, गौतम ऋषि से शब्द उचारो॥
त्रिम्बक क्षेत्र मे स्थान कियो तब गोरक्ष गुफा का नाम उचारो । को नही जानत है जग मे जती गोरखनाथ है नाम तुम्हारो ॥
सत्य वादी भये हरिश्चंद्र शिष्य तब, शुन्य शिखर से भयो जयकारों ।
गोदावरी का क्षेत्र पे प्रभु ने, हर हर गंगा शब्द उचारो।
यदि शिव गोरक्ष जाप जपे, शिवयोगी भये परम सुखारो। को नही जानत है जग मे जती गोरखनाथ है नाम तुम्हारो ॥
अदि शक्ति से संवाद भयो जब, माया मत्सेंद्र नाथ भयो अवतारों ।
ताहि समय प्रभु नाथ मत्सेंद्र, सिंहल द्वीप को जाय सुधारो । राज्य योग मे ब्रह्म लगायो तब, नाद बंद को भयो प्रचारों । को नही जानत है जग मे जती गोरखनाथ है नाम तुम्हारो ॥
आन ज्वाला जी किन तपस्या, तब ज्वाला देवी ने शब्द उचारो । ले जती गोरक्षनाथ को नाम तब, गोरख डिब्बी को नाम पुकारो॥




आधुनिक केसरी

**जीवात्मा हे वर्म | जाण आता ||**


**देहाचा आत्म्याला | लाभता आधार ||**
**अंश हो साकार | निर्गुणाचा ||१||**
**मनाचिया संगे | इंद्रिये बाधले ||**
**विकारे बांधिले | माया पाश ||२||**
**पडता विसर | स्वधर्माचा जीवा ||**
**जागवी दानवा | अहंकार ||३||**
**भोगोनिया भोग | फेड इथे पांग ||**
**जोडोनी सत्संग | शुद्ध होई ||४||**
**हरिनाम घेता | आठवी स्वधर्म ||**
**जीवात्मा हे वर्म | जाण आता ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**ज्ञान से सुमिरन भजन है,**
**मन अरु प्राण न होय ।**
**याते कर्म न सन्त मत, सन्त अमत मत सोय ।।१८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल नवम अध्याय) ०२/०९/१८ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : अनुभवयुक्त चेतन मार्गा द्वारेच म्हणजेच विहंगम मार्गा द्वारेच परमेश्वराचे स्मरण आणि भक्ती होते, जिथे प्राण आणि मन असत नाहीत. म्हणून मन आणि प्राण रहित असल्याने संतमत कर्म-प्रकृतीत येत नाही. हे संताचे( नित्य अनादि सद्गुरूदेवांचे ) मत अमत आहे. प्रकृती आधार सोडून चिन्मय स्वरूपाने परब्रह्म प्राप्तीची साधना होते म्हणून संतमत प्राकृतिक कर्म आणि धर्माहून पृथक् आहे. याची साधना चेतन-भेद-अनुभवा द्वारे होते.**




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# सदाचरण परमार्थाचा पाया आहे

आधुनिक केसरी

राम सहज हाती लागेल म्हणून जी काही साधने समर्थांनी सांगितली आहेत, त्यांमध्ये चांगल्या ग्रंथांचे वाचन हेही एक आहे. परंतु कोणत्याही ग्रंथाचे अगर पोथीचे वाचन करताना, केवळ काहीतरी वाचायचे म्हणून वाचन करू नये. अर्थ कळल्याशिवाय पोथी खरी वाचल्यासारखे नाही होणार; तसेच, जितका त्याचा अर्थ कळला तितके तरी कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा. आपण जे करीत नाही ते प्रथम करायला सुरुवात करावी. भाराभर वाचले आणि कृती केली नाही, तर काय उपयोग ? चार मैलांचा रस्ता असला तर सबंध रस्ता एकदम दिसावा असे म्हटल्याने कसे होईल ? एक मैल रस्ता चालावा, म्हणजे पुढचे दिसेल. जसजशी मजल मारावी तसतसे पुढचे दिसू लागेल. परमार्थाचेही असेच आहे. बापासारख्या मिशा मला याव्या म्हणून लहान मुलाने हट्ट धरला तर कसे होईल ? त्याचप्रमाणे, आजच मला देवदर्शन व्हावे म्हटले तर कसे होईल ? सद्गुरूची आज्ञा पाळावी, साधन करू लागावे, म्हणजे सर्व काही होते. जेवायला बसले म्हणजे



पोट भरायचे राहते का ? खरोखर परमार्थाची वाट अगदी सरळ आहे; प्रपंचाचा रस्ता मात्र डोंगराळ असून काटेकुटे यांनी भरलेला आहे. आपला प्रपंच हा परमार्थाच्या सोयीसाठी असायला पाहिजे. पण याच्या उलट, आपला परमार्थच मुळी आपल्या प्रपंचाच्या सोयीसाठी आपण केला आहे. कुंपणाने शेत खावे तसे आपले झाले आहे. शेताला कुंपणाची जरूरी आहे; नाहीतर ढोरे आत येऊन शेत फस्त करतील. पण कुंपणच जर बेसुमार वाढले, तर त्यामुळे शेताचे नुकसान होते हे जाणले पाहिजे. ज्याने व्यवहार तपासून केला, त्याला परमार्थ साधलाच. परमार्थ हा साखरेसारखा आहे. आपण साखरेचे कारले जरी केले तरी ते खायला गोडच लागते, तसे प्रपंचातसुद्धा परमार्थ केला तरीही तो गोडच असतो. परमार्थ हा आपल्यासाठीच असल्याने तो आपल्याला शक्य आहे किंवा नाही हे विचार करून पहावे; आणि तो आपल्याला शक्य आहे असे जर पटले, तर मात्र केल्याशिवाय राहू नये. पोटात अन्न घालण्यासाठी जसे तोंड, त्याचप्रमाणे परमार्थाला सदाचरण आवश्यक आहे. सदाचरण हा परमार्थाचा पाया आहे. पाया म्हणजे काही घर नव्हे, परंतु पायाशिवाय मात्र घर नव्हे, हे देखील तितकेच खरे. आपण स्वतःच्या मुलाला जसे प्रेमाने घेतो तसा परमार्थ करावा; आणि आपण दुसऱ्याच्या मुलाला जसे घेतो तसा प्रपंच करावा. भगवंताच्या स्मरणात प्रपंच सुखाचा करणे हाच खरा परमार्थ, आणि ज्याची वृत्ती सुधारून भगवंताकडे लागली त्यालाच खरा परमार्थ कळला.

**१७७. भगवंतावर अकारण प्रेम करणे याचे नाव परमार्थ.**

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

या जन्माचे सोने करणे मात्र माझ्या हातात आहे. शुध्द विचार,आचार, सदाचार, सद्भावना, आणि ईश्वरावर नितांत विश्वास हे गृहीत धरून चालणे, जीव म्हणून जगत असताना आलेल्या खड्यांना चुकवत पुढे जायचे हे तर आपल्या हातात आहे ना! तेज,अग्नी,वायु या शिवाय पृथ्वी वर जीव जगू शकत नाही. परंतु वासना वायु सारखी सूक्ष्म आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २६ जून २०२४
adhunikkesari.com

# जालन्यातील मेडिकल कॉलेज याच शैक्षणिक वर्षापासून सुरु व्हावे यासाठी प्रयत्न : आ. कैलास गोरंट्याल

## मेडिकल कौन्सिलच्या पथकाने केली जागांची चाचपणी

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** राज्य शासन आणि प्रशासकीय पातळीवर मागील तीन वर्षात मोठा संघर्ष करून जालन्यासाठी मंजूर करून आणलेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यावर्षी कोणत्याही परिस्थितीत सुरू झाले पाहिजे अशी आपली भूमिका असून याबाबत येत्या २७ जूनपासून सुरू होत असलेल्या महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात आवाज उठवणार असल्याचे आ. कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

जालना तालुक्यातील अंबड रोडवर असलेल्या गणेश नगर मध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आलेली जागा तसेच या शैक्षणिक वर्षापासून १०० विद्यार्थी क्षमतेचे कॉलेज सुरू करण्यासाठी ग्लोबल कॉलेज, जिल्हा सरकारी रुग्णालय आणि महीला व बाल रुग्णालय या ठिकाणी जागेची चाचपणी करण्यासाठी इंडीयन मेडिकल काऊंसिलच्या वतीने जालना दौऱ्यावर आलेल्या डॉक्टरांच्या एका पथकाने आज केली आहे. या पथकात हिमाचल प्रदेश येथील जवाहरलाल नेहरु मेडिकल कॉलेजचे डॉ. सुंदरसिंग डोग्रा, उदमपुर येथील एन. टी. मेडिकल कॉलेजचे डॉ. मोहम्मद आसिफ, डॉ.निशांत सहाय पाटणा, डॉ.सुनीलकुमार आर्य गोरखपूर यांचा समावेश होता. त्यांच्या समवेत जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. सुधीर चौधरी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील आदींची उपस्थिती होती. सदर पथकाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेची तसेच कॉलेज सुरू करण्यासाठी जागेची पाहणी केल्यानंतर पथकातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह डॉक्टरांनी हॉटेल अंबर येथे जालन्याचे आमदार कैलास गोरंटयाल यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी आ. गोरंटयाल यांनी पथकातील सर्व वरिष्ठ अधिकारी आणि डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलतांना आ.कैलास गोरंटयाल म्हणाले की, जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करावे यासाठी आपण मागील तीन वर्षांपासून शासनाशी संघर्ष करत आहे. विधिमंडळाच्या विविध अधिवेशनात देखील आपण त्यासाठी वेळोवेळी आवाज उठवून सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधले. आपल्या या मागणीची दखल घेऊन अखेर राज्य सरकारने जालना येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजुरी दिली. मात्र, मंजुरीनंतरही जागा निश्चितीसाठी अनेक अडथळे निर्माण झाले होते. मात्र, आपण हार न मानता आपला संघर्ष सुरू ठेवला. राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून अखेरीस जालना - अंबड रोडवरील गणेश नगर येथे असलेली शासकीय जमीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आली. एव्हढेच नव्हे तर या महाविद्यालयासाठी सुमारे ४०४ कोटी रुपयांचा निधी देखील राज्य सरकारकडून उपलब्ध करून घेतला असल्याचे सांगून आ.कैलास गोरंटयाल म्हणाले की, चालू शैक्षणिक वर्षापासून १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे कॉलेज सुरू व्हावे यासाठी देखील आपण राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत असून त्याच अनुषंगाने आज सोमवारी इंडीयन मेडिकल काऊन्सिलच्या वतीने वरिष्ठ अधिकारी आणि डॉक्टरांच्या पथकाने जालना दौऱ्यावर येत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नियोजित जागेसह तात्पुरत्या स्वरुपात कॉलेज सुरू करण्यासाठी तीन जागांची चाचपणी केली आहे. १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे कॉलेज याच शैक्षणिक वर्षापासून सुरू व्हावे यासाठी आपण प्रयत्नशील असून आता जून महिना संपत आला असून जुलै महिना लवकरच सुरू होणार आहे. येत्या २७ जूनपासून सुरू होत असलेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनात याबाबत आपण आवाज उठवणार असून कॉलेज सुरू करण्यासाठी आग्रही भूमिका घेणार असल्याचे आ.कैलास गोरंटयाल यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी नंदकिशोर जांगडे, दीपक भुरेवाल, राम सावंत, महावीर ढक्का, दिलीप मोरे, अरुण मगरे, विजय इगेवार, अशोक भगत, दत्ता पाटील, गोपाल चित्राल आदींची उपस्थिती होती.



# आ. हरिभाऊ बागडेंच्या हस्ते वाघोळा जि.प.शाळा इमारतीचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वाघोळा येथे आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांनी मंजूर केलेल्या व बांधकाम पूर्ण झालेल्या जि.प.शाळा इमारतीचे लोकार्पण माजी विधानसभा अध्यक्ष तथा फुलंब्री विधानसभा मतदार संघाचे आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. निधी उपलब्ध करून दिल्यानंतर वाघोळा येथील स्थानिक पदाधिकारी, शिक्षण प्रेमी नागरिक, आणि गावकरी यांनी आगामी काळाची पावले ओळखत त्या पद्धतीने शाळेचा प्लॅन तयार करून घेऊन ठेकेदारकडून दर्जेदार आणि देखणी इमारत तयार करून घेतल्याने इमारतीचे लोकार्पण करताना विशेष आनंद वाटला.आणि विद्यार्थ्यांशी झालेल्या संवादातून शैक्षणिक प्रगती अतिशय छान वाटल्याने शिक्षकाच्या कामाचा विशेष अभिमान वाटला, ग्रामीण भागातील दर्जेदार शिक्षणासाठी माझा नेहमी आग्रह आणि प्रयत्न राहिला आहे, मतदार संघातील प्रत्येक गावातील शाळेला वर्ग तेवढ्या वर्ग खोल्या या राबवलेल्या उपक्रमा अंतर्गत वर्ग तेवढ्या शाळा खोल्या झालेल्या आहेत,आगामी काळातील मागणी प्रमाणे दुरुस्ती आणि नवीन शाळा खोल्यांचे नियोजन करता येईल. असे प्रतीपादन या वेळी आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांनी केले. देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. किशोरजी शितोळे यांनी शालेय विद्यार्थ्यांना शिकून खूप मोठे होण्याचा सल्ला देत, वाघोळा येथील शेतकरी नव उद्योजकांसाठी, विविध शासकीय कर्ज योजनेच्या माध्यमातून देवगिरी बँक नियमित आपल्या पाठीशी उभी राहील अशी ग्वाही या वेळी दिली. या वेळी किशोर शितोळे (अध्यक्ष देवगिरी सहकारी बँक), सुहासजी शिरसाठ (जिल्हाध्यक्ष भाजपा), सौ. अनुराधाताई चव्हाण (सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्री), सांडू पाटील जाधव (तालुका अध्यक्ष भाजपा, फुलंब्री), शिवाजी महाराज पाथ्रीकर (माजी जि प सदस्य), सर्जेराव पाटील मेटे (माजी पंचायत समिती सभापती), श्री. नाथाआप्पा काकडे (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्री), श्री. विकास जाधव (आर्किटेक्ट), नंदू पाटील कोलते (चेअरमन खरेदी विक्री संघ फुलंब्री), रेखा कवाळे (पोलीस पाटील), ऐश्वर्या गाडेकर (माजी पंचायत समिती सदस्य), प्रभाकर पाटील सोटम, रामेश्वर पाटील गायकवाड (माजी मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा वाघोळा), सर्जेराव पाटील हरकळ (माजी केंद्रप्रमुख जि प केंद्र धामणगाव), भास्कर पाटील गायकवाड (शालेय समिती अध्यक्ष), पुष्पाताई अरुण गायकवाड (सरपंच) यांच्यासह मोठ्या प्रमाणावर गावकरी व पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री बाविस्कर सर, गावच्या वतीने मनोगत विकास गायकवाड, सूत्रसंचालन राम गायकवाड, तर आभार आत्माराम गायकवाड यांनी केले.

# ६.८४ लाख क्विंटल ज्वारी खरेदी होणार

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** राज्यात पणन महासंघाकडून रब्बी हंगामातील ज्वारी खरेदीचे वाढीव सहा लाख ८४ हजार क्विंटलच्या उद्दिष्टाला केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. या खरेदीला ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देखील देण्यात आली. या संदर्भात अन्न, नागरी पुरवठा मंत्रालयाकडून पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांसह संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले आहे. अकोला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उत्पादित झालेल्या ज्वारी खरेदीचा मार्ग देखील मोकळा झाला. शासनाकडून आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२३-२४ साठी सुरुवातीला एक लाख ३६ हजार क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट पणन महासंघास देण्यात आले होते. त्यानुसार राज्यात ज्वारी खरेदी सुरू केली. अधिक ज्वारी खरेदीची शक्यता विचारात घेऊन खरेदीचे उद्दिष्ट सहा लाख ८४ हजार क्विंटल करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. दरम्यान, अकोला व अमरावती जिल्ह्यांना देण्यात आलेले ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाले. दोन्ही जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ज्वारी खरेदी उद्दिष्ट वाढवून देण्यासंदर्भात मागणी केली. रब्बी पणन हंगाम २०२३-२४ मध्ये मूळ एक लाख ३६ हजार क्विंटलच्या उद्दिष्टात बदल न करता सहा जिल्ह्यांचे एकूण ५३ हजार ५०० क्विंटलचे उद्दिष्ट घटविण्यात आले.

# छत्रपती संभाजीनगर, नाशिक व नागपूर शहर गोव्याला हवाईमार्गाने जोडणार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** लोकसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर सरकारने नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग तूर्तास थंडबस्त्यात टाकला आहे. मात्र, इंडिगोने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि नागपूर या शहरांना गोव्याला हवाई मार्गाने जोडण्याचा निर्णय घेतला आहे. इंडिगोची गोवा- नागपूर (मार्गे नाशिक) विमानसेवा १ जुलै २०२४ पासून सुरू होत आहे. ही सेवा सोमवार, बुधवार, शुक्रवार आणि रविवारी राहील. गोवा येथून दुपारी २.१० वाजता निघेल आणि नागपुरात सायंकाळी ६.१० वाजता पोहोचेल. नागपूर-गोवा (मार्गे नाशिक) विमानसेवा १ जुलैपासून सुरू होत आहे. ही सेवा सोमवार, बुधवार, गुरुवार आणि रविवारी राहील. नागपूर येथून सकाळी ९.४० वाजता निघेल आणि गोव्यात दुपारी १.३० वाजता पोहोचेल.गोवा-छत्रपती संभाजीनगर विमानसेवा २ जुलैपासून सुरू होत आहे. ही सेवा मंगळवार, गुरुवार आणि शनिवारला राहणार आहे. गोवा येथून दुपारी २.१० वाजता निघेल आणि औरंगाबादला दुपारी ४.१० वाजता पोहोचेल. छत्रपती संभाजी नगर-गोवा विमानसेवा २ जुलैपासून सुरू होत आहे. ही सेवा मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी असणार आहे. औरंगाबाद येथून सकाळी ११.३० वाजता निघेल आणि गोव्याला दुपारी १.३० वाजता पोहोचेल.गोवा- नागपूर (मार्गे छत्रपती संभाजीनगर) विमानसेवा २ जुलैपासून सुरू होत आहे. ही सेवा मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी असणार आहे. गोवा येथून दुपारी २.१० वाजता निघेल आणि नागपूर येथे सायंकाळी ६.१० वाजता पोहोचेल.

## इंडिया आघाडीत बिघाडी?

आधुनिक केसरी

लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुत मिळाल्यानंतर केंद्रात एनडीएच सरकार स्थापन झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह काही खासदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर आता संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून आज अधिवेशनाचा दुसरा दिवस होता. सर्व नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी पार पडला. मात्र, लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडीवरून अटीतटीचे राजकारण पाहण्यास मिळत आहे. एनडीएकडून ओम बिर्ला यांनी पुन्हा एकदा लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी नामांकन अर्ज दाखल केला आहे. तर इंडिया आघाडीकडून लोकसभा अध्यक्षपदासाठी काँग्रेस खासदार के.सुरेश यांना उमेदवारी दिली. आता लोकसभा अध्यक्षपदासाठी बुधवारी सकाळी ११ वाजता निवडणूक होणार आहे. लोकसभा अध्यक्षपदासाठी इंडिया आघाडीकडून काँग्रेस खासदार के.सुरेश यांना उमेदवारी देण्यात आल्याने तृणमूल काँग्रेसने याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच काँग्रेसकडून तृणमूल काँग्रेस पक्षाला विश्वासात घेतलं नसल्याचा आरोप केला आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे आता लोकसभा अध्यक्षांच्या उमेदवारीवरून इंडिया आघाडीत बिनसलं असल्याची चर्चा रंगली आहे. तृणमूलच्या भूमिकेमुळे पहिल्याच अधिवेशनात इंडिया आघाडीत बिघाडी सुरु झाल्याची टीका होऊ लागली आहे. लोकसभा अध्यक्षांच्या उमेदवारी संदर्भात बोलताना तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी म्हणाले, लोकसभा अध्यक्षपदासाठी विरोधी पक्षाचे उमेदवार म्हणून के सुरेश यांना नामनिर्देशित करण्यात आले. मात्र, के सुरेश यांना नामनिर्देशित करण्यापूर्वी काँग्रेसने तृणमूल काँग्रेस पक्षाची सल्लामसलत करायला हवी होती. मात्र, कोणतीही चर्चा केली नाही. याबाबत आमच्याशी संपर्क साधला गेला नाही. कोणतीही चर्चा झाली नाही. त्यामुळे दुर्दैवाने हा एकतर्फी निर्णय आहे, असे अभिषेक बॅनर्जी यांनी म्हटले आहे. इंडिया आघाडीकडून लोकसभा उपाध्यक्षपदावर दावा करण्यात आला होता. यासाठी सत्ताधारी व विरोधकांमध्ये चर्चा झाली. मात्र, या चर्चांमध्ये एकमत झाले नाही. त्यामुळे सत्ताधाऱ्यांकडून उपाध्यक्षपदाची मागणी मान्य न झाल्यामुळे इंडिया आघाडीच्या नेत्यांनी लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उमेदवार देण्याचा निर्णय घेतला. लोकसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही प्रतिक्रिया दिली होती. ते म्हणाले होते, मल्लिकार्जुन खरगेंना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा फोन आला. फोनवरुन राजनाथ सिंह यांनी लोकसभा अध्यक्षपदासाठीच्या एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा, अशी विनंती केली. आम्ही विनंती मान्य करुन एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देऊ. पण लोकसभेचे उपसभापतीपद विरोधकांना मिळाले पाहिजे. मल्लिकार्जुन खरगे यांना फोन परत करणार असल्याचे राजनाथ सिंह यांनी काल सांगितले होते. मात्र त्यांनी फोन केला नाही, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

## राजर्षी शाहू महाराजांची समता आणि वर्तमान स्थिती



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**आपला बहुजन समाज साक्षर असून चालत नाही, तर शहाणा व सुसंस्कृत असावा यावर त्यांचा कटाक्ष होता. वेदोक्त प्रकरणात पडलेल्या पुरोहिंताना वठनीवर आणण्यासाठी महाराजांनी त्यांची वतने रद्द केली. दलित समाजाला कार्यालये, शैक्षणिक संस्था, यामध्ये प्रतिनिधित्व मिळून दिले. त्यामुळे विरोधकांनी अतिशय ओरड केली, यापुढे जाऊन ते धर्म बुडाला असे म्हणाले, परंतु सामाजिक न्याय व समता, बहुजन समाजाची उन्नती यासाठी महाराजांनी आपले सर्वस्व पणाला लावले, अंधश्रद्धेचे महत्त्व पटवण्यासाठी शाहू महाराजांनी गवताच्या काडीला महत्त्व नाही, पण पेंढीला आहे.**

म्हणून 'संघटित व्हा असा उपदेश त्यांनी शेतकऱ्यांना व कामगारांना केला' म्हणून त्यांना बहुजनांचा कैवारी, लोककल्याणकारी राजा, प्रजावत्सल, दलितबंधू, जनतेचे पुरस्कर्ते ,निधड्या छातीचे ते समाजसुधारक व आणि कोल्हापूर संस्थानाचे अधिपती अशा कितीतरी उपाध्या लोकांनी त्यांना दिल्या. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कार्याचा आढावा आणि आजची वर्तमान परिस्थिती कशी आहे. त्याचा आपण या लेखात थोडक्यात विचार करणार आहोत. त्यासाठीच हा लेखन प्रपंच साहित्यिक विठ्ठल बरसमवाड करीत आहेत. राजर्षी शाहू महाराजांचा जन्मदिन सामाजिक न्याय दिवस म्हणून सर्वत्र अतिशय आनंदाने हर्षल्हासित होऊन पाळला जातो. खरोखरच राजर्षी शाहू महाराज हे मानवतावादी समाज सुधारक व बुद्धिवादी विचारवंत होते. आज दोन अडीच शतके उलटून गेले तरीही त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याची आपणाला दररोज आठवण येते. मानवी जीवन जगत असताना आपण दुसऱ्याचा विचार करणे ही आपली संस्कृती आहे .दुसऱ्याच्या ताटातील अन्न घेऊन खाणे ही विकृती आहे. असे आपण अनेक ठिकाणी वाचलो आहोत. जे रंजले- गांजले आहेत .त्यांना आपले म्हणून माणुसकी शिकून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे म्हणजे मानवता होय .महाराजांनी उभ्या आयुष्यात वंचितांचा विचार केला. दुर्बल घटकांना शिष्यवृत्ती देऊन पुढे आणले.दररोज पोलीस स्टेशनला जाऊन हजेरी देणाऱ्या जाती-जमातीची त्यातून सुटका केली, जे पालक मुलांना शाळा शिकवत नाहीत. घरी ठेवून घेतात, त्यांना 1 रूपये दंड लावून शैक्षणिक वातावरण निर्माण करून त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. अल्लादिया खॉ व बाबूराव पेंढारकर यांच्या कलेला त्यांनी राजाश्रय दिला म्हणून त्यांना कलेचे भोक्ते म्हणतात. सर्व जाती धर्मांची त्यांनी वस्तीगृहे काढली, अन्नदानापेक्षा विद्यादान श्रेष्ठ आहे.असे नेहमी लोकांना ते पटवून देत अनेक विद्यापीठांना त्यांनी भरघोस आर्थिक मदत केली, आंतरजातीय विवाहांना मंजुरी दिली. यावरून असे लक्षात येते की ते सर्वांचेच राजे होते, .छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कुस्ती खेळाला राजाश्रय मिळवून दिले. हे सर्व त्यांच्या काळामध्ये मानवतावादी दृष्टिकोनातून होत होते.एकदा काय झाले? संस्थानात अनेक घोड्यांना दाणापाणी द्यायचे होते. तेव्हा महाराजांनी नोकर चाकरांना सांगितले. मैदानावर सर्व हरभरे एका ठिकाणी टाका आणि त्या पद्धतीने नोकर चाकरांनी मैदानावर हरभऱ्याचा ढीग घातला. थोड्या वेळानंतर त्याने त्या ढीगावर पागेतून घोडे सोडण्या सांगितले .जे घोडे दणकट मजबूत व चपळ आहेत अशा घोड्यांनी पळत जाऊन त्या ढीगावरील हरभरे पटापट खायला सुरुवात केले. परंतु जे घोडे दुबळे,अपंग, कमजोर आहेत ते पाठीमागेच राहिले .त्यांना एक हरभऱ्याचा दाणा सुद्धा मिळाला नाही. त्यावेळेस महाराजांच्या लक्षात अशी गोष्ट आली की काही मानव असेच शूरवीर आहेत. दणकट आणि मजबूत आहेत. आणि काही अतिशय गरीब दीन,दुबळे, पीडित,वंचित आहेत, त्यामुळे त्यांनी त्यांचा हिस्सा काढून ठेवावा असे म्हटले, म्हणून तेव्हा पासून आरक्षण हे शस्त्र वापरले, त्यामुळे त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात.आणि माणसाला माणसासारखे वागावे हे शिकवले म्हणून त्यांना समतेचे राजे म्हणतात नागपूर येथील क्षत्रिय कुर्मी समाजाने त्यांना राजर्षी ही पदवी बहाल केल्यामुळे ते राजांचे राजे म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. आज वर्तमान परिस्थिती बदलली आहे. आज कोणाचाच विश्वास कोणावर राहिलेला नाही. शैक्षणिक दृष्ट्या संख्यात्मक विकास होत आहे. गुणात्मक विकास झाला नाही. शिक्षणाची सध्या दुरावस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे शिक्षण शिकून अनेक जण बेरोजगार आहेत,पूर्णपणे सखोल वाचन नाही, त्यामुळे आरडा ओरड सुरू झालेली आहे, त्यामधूनच जाती-जातीमध्ये दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण होते की काय ?अशी अवस्था निर्माण झाली आहे. समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण झाल्यास राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होतो.जातीय दंगली घडून येतात.प्रत्येकाला प्रत्येकाच्या हिश्यानुसार द्यावे, कोणी कोणाचे ओरबाडून घेऊ नये, म्हणून महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचे राज्य आपल्यावर असताना सुद्धा सर्वांसाठी चांगले कार्य केले. स्वतःसोबत त्यांनी सर्व जातीय धर्माच्या लोकांना घेऊन



राज्य करीत होते. राधानगरी सारखे मजबूत धरण बांधून सर्वांना फायदा करून दिले. त्यांच्या दरबारात कधी जात -पात ,उच्चनीच्चता ,अस्पृश्यता, यांचा भेदभाव झाला नाही. आजची परिस्थिती लांच्छांनास्पद निर्माण झाली आहे. आज कोण कोणाला जवळ करीत आहे? हे कळेनाशी झाले आहे. अल्पसंख्याकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. रोज दंगली, रस्ता रोको, उपोषण वेगवेगळे शिष्टमंडळ भेटी यामुळे समाजात. अराजकता निर्माण झाली .त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांची आठवण दररोज येत आहे,हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराज , राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.आंबेडकरांचां आहे. त्यांनी माणसाला माणुसकीचे धडे दिले. दुबळ्यांना महाराजांनी शिष्यवृत्ती देऊन पुढे आणले .आणि आज या सर्व गोष्टीवर एकमेकांची पात्रता काढून समाजात विभागणी होत आहे. हे वातावरण जास्त दिवस चालले तर अनेक अघटीत घटना घडतील म्हणून शाहू महाराजांच्या विचारानुसार चालावे ते बुद्धिवादी विचारवंत होते.सर्वांना घेऊन चालणारे होते. त्यांच्या पुढे आपल्याला आज कळत नाही .असे मला वाटते म्हणून समतावादी राजांनी माणूसकी शिकवली. आज आपल्याकडे साधनसामग्री ,संगणक आले, माणूस आज आकाशात उड्डाण घेत आहे, आहे. चंद्रावर ,मंगळावर वस्ती करण्यास उत्सुक झाला आहे , सागराच्या तळाशी जात आहे. परंतु जातीनी तो आज विषम राहिला आहे. जातीमुळे आपल्या राष्ट्राला अधोगती निर्माण होत आहे.जातीय दंगली निर्माण झाल्यामुळे गट पडून अनेक वेगवेगळ्या जातीनुसार समाजसुधारकांच्या जयंती, पुण्यतिथी या दररोज साजऱ्या केल्या जात आहेत. आपल्या मागे करून कोणी नाही असे अनेक जणांना वाटत असल्यामुळे त्यांच्या मनात नेहमीच भीतीचे वातावरण तयार झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात अठरा पगड जातींना घेऊन आपले स्वराज्यचे निर्माण केले आणि आज नेमकी उलटी परिस्थिती निर्माण होत आहे. अशा जर जाती-जाती वाटून घेतल्या तर शुरावीरांचं काय? या देशासाठी बलिदान देणारे सर्व जाती धर्माचे लोक होते. आज आपण त्यांना सुद्धा कमी समजत आहोत काय?. अशी परिस्थिती निर्माण झाली, म्हणून राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक, शैक्षणिक ,राजकीय केलेल्या कार्याच्या विचारांची आज सर्वांनाच नितांत आवश्यकता आहे. ते जात न पाहता त्याची योग्यता पाहून आपल्या दरबारात समाविष्ट करत असत. हिंदू , मुस्लिम असा कोणताही त्यांच्याकडे भेदभाव नव्हता म्हणून आज त्यांचे विचार जिवंत आहेत. व मौल्यवान आहेत. त्यांच्या विचारांची पेरणी करणे आज काळाची गरज आहे. जर माणसाच्या मनात इतरांविषयी द्वेषाचे अग्नि पेटल्यास तो सूड घेण्याच्या दृष्टीने मैदानात उतरतो. आणि मग स्वतःचा व इतरांचा नाश करतो.म्हणून असे न होता वेळीच आपण सावरून घ्यावे ,कोणीच कोणाला दोषी ठरू नये. तरच आपल्या सर्वांचे त्यात भले आहे असे मला वाटते. मानवा मानवामध्ये निर्माण होणारा धार्मिक संघर्ष आणि सामाजिक संघर्ष यातून फार मोठे दहशतवाद कृत्ये निर्माण होईल आणि लोकशाही समोर सर्वात मोठे आव्हान उभे राहिल, त्यावेळी समाजाला स्थैर्य लाभत नाही, लोकांमध्ये सैरभैराचे वातावरण निर्माण होते. सार्वजनिक क्षेत्रात वागताना प्रत्येक माणूस इतरांपासून घाबरून मनात भीती धरून वागत आहेत. त्याच्यातूनच जमात वाद उदयाला येतो, त्यावेळी शासनासमोर अनेक प्रश्न आ वासून उभे राहतात. असे काही न होता नागरिकांचे सक्षमीकरण मानवी मूल्याचे जतन करणे महत्त्वाचे वाटते. म्हणून शाहू महाराजांनी या सर्व गोष्टीचा विचार करून आपल्या संस्थानात सर्व धर्मीयांना आपलेसे करून आपले संस्थान उंचीवर नेऊन ठेवले होते. त्यामुळे ऐसा राजा होणे नाही असे लोक आजही बोलतात. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ या सर्वांनीच लोकांना समानतेने वागवून समतेचा संदेश दिला. आज असे होताना दिसत नाही. प्रत्येक ठिकाणी असमानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजामध्ये राजकारण घुसून जर परिस्थिती हाताबाहेर गेली तर सामाजिक शांतता बिघडेल आणि शाहू महाराजांच्या विचाराला गालबोट लागेल. भारतीय राज्यघटनेने दिलेले हक्क अधिकार सर्वांनीच पाळावेत तेव्हा आपली ही बलाढ्य लोकशाही गुण्यागोविंदाने नांदेल, नाहीतर विषमता निर्माण होऊन मानवा मानवात कलह निर्माण होईल. याचे परिणाम संपूर्ण समाज व्यवस्थेवर होऊन समाजात दरी निर्माण होईल. या संधीचा फायदा अनेक आजूबाजूचे देश घेऊन आपण कधी पारतंत्र्यात गेलो की हेही कळणार नाही. म्हणून शाहू महाराजांचे विचार आपण सर्वांनी आचरणात आणावे. त्यांच्या कार्याची माहिती करून घ्यावी तेव्हाच त्यांची जयंती साजरी केल्याचे सार्थक होईल. जयंतीच्या निमित्ताने त्यांना कोटी कोटी प्रणाम.

## वाईट वेळ वाट्याला येणं म्हणजे संपणे नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**वाईट वेळ म्हणजे संपण असं अजिबात नसत.निसर्ग चक्र वेळेच्या भोवती फिरत असत.वेळ हि प्रभावी असेल तर सगळं काही सुरळीत होत पण वेळ प्रभावी नसली तर मग संकटांची मालिका सरत नाही. वेळेचा प्रतिकुल आणि अनुकुल प्रभाव प्रत्येकाच्या जीवनात अनुभावास येतच असतो.वेळ प्रतिकुल झाली म्हणजे पिछेहाट जरूर होते.पण पिछेहाट होण म्हणजे संपुष्टात येण असं होतं नाही.प्रतिकुल वेळ अनुकूल सुद्धा होऊ शकते पण त्यासाठी काही काळ हा वाईट जाणवतो तो व्यतित करावाच लागतो त्या मध्ये कोणालाही विशेष सुट मिळत नाही.जीवन आणि वेळेचा प्रभाव याला सृष्टी वर कोणीही अपवाद नाही.सृष्टी वर जन्म घेतलेल्या प्रत्येक जीवाला वेळेच्या प्रभावाला सामोरे जाणेही ही जाणे आहे.**

मग तो दिग्गज असो कि सर्वसामान्य माणुसं आयुष्य म्हटलं कि चांगली वाईट वेळ वाट्याला येणार म्हणजे येणारच या मध्ये अजिबात शंका नाही पण वाईट वेळ हि थोडी कठिण असल्याने हि वेळ कोणालाही नकोशी असतेच.वाईट वेळ आली म्हणजे आपण संपलो अथवा हि वेळ आपल्याला संपविण्यासाठी अथवा संपुष्टात आणण्यासाठी आली आहे असं अजिबात नाही.जीवन म्हणजे संघर्ष हे सुत्र समजलं तर मग वाईट वेळ सुद्धा आपलं काही बिघडवु शकत नाही.संघर्ष हे वेळेवर जलिम औषधं असतं.वाईट वेळ संधी घेऊन येते तीच सोन करता आलं पाहिजे पण अनेकदा आपण वाईट वेळेच सोन करण्या ऐवजी राख करतो.आणि वेळेला दोष देतो.दोष हा वेळेचा कधीच नसतो वेळेला आणि काळाला प्रत्येकाकडे जाणच आहे फक्त कोणाकडे कधी जायचं हे वेळेच्या हाती असतं.पण कालचक्र कोणालाही सोडत नाही.फक्त काळाच्या प्रभावात स्वतःला टिकवून ठेवणे आणि खंबीर पणे उभा राहण्याची आवश्यकता असते.आपल्या जीवनात वेळचा प्रभाव कधी निर्माण होऊन त्याचे काही दुष्परिणामही हे आपल्याला भोगावे लागतात याला कोणीच अपवाद नाही.जो पर्यंत वेळ आणि काळ यांचं पाठबळ आहे तो पर्यंत आपलं सगळं काही पाहिजे तसं घडत असतं.पण एकदा का वेळ फिरली कि आपली जशी अपेक्षा आहे त्याच्या उलटं परिणाम येतात आणि आपसुकच हे परिणाम आपल्यासाठी आणि आपल्या जवळपासच्या लोकांसाठी आनंददायी नसतात हे अगदी सत्य आहे.पण अशी वेळ येण अथवा या वेळेचा सामना करावा लागण म्हणजे संपुष्टात येण असं होतं नाही. जीवन म्हणजे अनिश्चिततेचा खेळ असतो.दैनंदिन जीवनात अनेक समस्या गुंतागुंत अडचणी निर्माण होण नैसर्गिक आहे क्रमप्राप्त आहे. त्याच बरोबर आपण ज्या क्षेत्रात ज्या ठिकाणी ज्या उंचीवर आहेत ती जागा उंची कधी कधी संकटात देखिल सापडते याच कारण त्या काळात आपली वेळ हि खराब असते.आपली वेळ खराब असल्याने आपले प्रयत्न यशात परिवर्तित होत नाही.अशा वेळी आपण घाबारून जाण उचित नाही अथवा तणाव घेऊन स्वतःला डिप्रेशन स्थिती पर्यंत घेऊन जाणं हे देखील योग्य नाही.आलेलं वादळ हे कधीच फार काळ थांबत नसत पण या भयाण वादळात आपल्याला फक्त खंबीरपणे उभा रहता आलं पाहिजे.वाईट वेळ असताना आपण प्रयत्न करण्या ऐवजी स्वतःला सावरलं पाहिजे आणि स्वतःला सावरलं कि मग आपोआपच अनुकूल वेळ निर्माण झाली कि आपल्या इच्छेनुसार घडामोडी घडणारच आहेत पण त्यापुर्वी आपण स्वतःला मजबुत ठेवुन उभा राहण आवश्यक असतं . वाईट वेळ हि कायम वास्तव्य करण्यासाठी अजिबात आलेली नसते.वेळेचा प्रभाव जगात कोणालाही टाळता येत नाही पण वेळ व्यवस्थित होण्याची वाट आपण नक्कीच पाहु शकतो आणि ज्या वेळी आपली वेळ आपल्याला अनुकूल असेल तेव्हा जगातील सगळ्या शक्ति आपल्या बाजूने उभा राहातात त्याच बरोबर नैसर्गिक शक्ति सुद्धा आपल्या बाजुने असतात म्हणून चिंता न करता तणाव न घेता आपली वेळ योग्य येई पर्यंत स्वतःला मैदानात खंबीरपणे ठेवता आलं पाहिजे.आणि वाईट वेळेचा प्रभाव दुर होई पर्यंत स्वतःला आध्यत्मिक ज्ञानाच्या छत्री खाली सुरक्षित ठेवता येऊ शकत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेतकऱ्यांत समाधान; कोवळ्या पिकांना मिळाले जीवदान, मोठ्या पावसाची प्रतीक्षा

## राजुर परिसरात तब्बल आठ दिवसानंतर पावसाची समाधानकारक हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** तालुक्यातील राजुर परिसरात मागील आठ दिवसपासा सुट्टीवर असलेल्य् वरूनराजेने सोमवार रात्री अचानक हजेरी लावली हजारो हेक्टरवरील खरिपातील कोवळ्या  पिकाना जीवनदान मिळाले.त्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे मात्र सोमवारी रात्री झालेल्या पाऊमुळे तात्पुरती पाऊसाची प्रतिक्षा संपली आहे .तरी पण मोठ्या पाऊसाची प्रतिक्षा अजून बाकीच आहे.भोकरदन तालुक्यातील राजुर परिसरात मृग नक्षत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली होतीण् त्यावर शेतकऱ्यांकडून पेरणी झाली.परंती आठ दिवसापासून पाऊसाने खंड दिल्याने शेतकर्यामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते .मृग नक्षत्र मध्ये सलग पाच दिवस पाऊस झाल्याने  बहुतांश जलसाठ्यात वाढ झाली परिणामी विहीर साठ्यात जेमतेम पाणी वाढ झाली .पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांकडून कापुस ,सोयाबीन, मक्का,अद्रक मुग,तुर,या पिकांची हजारो हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली. मात्र पेरणीनंतर



तब्बल आठ दिवस पाऊस साने खंड दिला .त्यामुळे नेकीच पेरलेली कोवळी पिके जिमिततून बाहेर येताच माना टाकु लागली होती करपु लागली होती. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांकडून विहिरीतून पाणी देण्याची सुरुवात केली होती.परंतु बहुतांश शेतकऱ्यात पाणी देण्याचे साधन नसल्यामुळे असे शेतकरी मात्र पाऊसाकडे डोळे लावून बसले होते. शिवाय बहुतांश शेतकऱ्याच्या पाउसाअभावी पेरण्या सुद्धा खोळंबल्या होत्या .मात्र सोमवारात्री आचानक आकाशात नभ बरून आले त्याचे रूपांतर पावसात झाले तासभर झालेल्या पाऊसामुळे खरिपातील पिके तरली आहे .आणि शेतकऱ्यांवर सुद्धा पाणी देण्याचा त्रास वाचला आहे.शिवाय पाऊसाने लंबी दडी दिली की बहुतांश शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहेत. भोकरदन तालुक्यात काही भागात पाऊस झाल् आहे तरी काही भागात अध्यापही पाऊस नसल्याची माहीती आहे. ज्या भागात पाऊस नाही अशा शेतकर्यानी अधापही पेरणीला सुरुवात केली नसल्याचे चित्र आहे.ज्या शेतकर्यांनी पेरणी केली आहे असे शेतकरी मात्र मोठ्या पाऊसाच्या प्रतिक्षेत आहेत.



# साईनाथ रुग्णालय येथे कॅन्सर शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबा संस्थानचे वतीने श्री साईनाथ रुग्णालय २२ ते २४ जुन रोजी श्री साईबाबा संस्थान कर्मचारी यांचेकरीता तोडांच्या व घशाच्या कर्करोग (HEAD AND NECK) तसेच महिला कर्मचारी यांचेकरीता BREAST CANCER SCREENING TEST या शिबीराचे आयोजन करणेत आलेले होते. या शिबीराकरीता लुपीन कंपनीने मोफत SCREENING TEST चे मशिन उपलब्ध करुन दिले होते. सदर SCREENING TEST शिबीराकरीता ०३ दिवसात  सुमारे ४१८ कर्मचारी यांनी  नोंदणी केली होती त्यापैकी ३१८ कर्मचारी यांनी  प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. दर शिबीराचे उद्घाटन श्री. साईबाबा  संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गोरक्ष गाडीलकर यांचे हस्ते करणेत आले. या प्रसंगी बोलताना  श्री गाडीलकर म्हणाले की,  श्री साईबाबा संस्थानमधील सर्वच कर्मचारी यांची  टप्प्याटप्प्याने कॅन्सर तपासणी रणेत येणार आहे. कर्मचारी बांधवानी सदरील तपासणी शिबिराला घाबरुन न जाता तपासणी करून घ्यावी तपासणीमधुन निदान झालेल्या कर्मचाऱ्याला कॅन्सरशी लढताना संस्थान पुर्णपणे पाठीशी खंबीरपणे उभा राहणार आहे. तरी संस्थानमधील कर्मचारी यांनी आपल्या आरोग्याची नियमीतपणे  काळजी घ्यावी  कर्मचाऱ्यांकरीता असेच तपासणी शिबीरे यापुढेही केली जातील.

या प्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, वैद्यकीय संचालक डॉ.प्रितम वडगावे, वैद्यकीय अधिक्षक डॉ.मैथिली पितांबरे वैद्यकीय संचालक प्रितम वडगावे, कॅन्सरतज्ञ  डॉ.मुकुल घरोटे,  पंकज घुगे राहुल गुप्ता,अपर्णा (जीनवाल) जाधव. डॉ.संपदा  दाभाडे नजमा सय्यद,  प्रमोद गोरक्ष यांचा सह रुग्णालयातील सर्व कर्मचारी, रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

# स्मार्ट मीटर विरोधात जनजागृतीसाठी रथ

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** वीज ग्राहक बचाव समितीतर्फे येथे सुरु करण्यात आलेल्या स्मार्ट मीटर हटाव आंदोलनाचा भाग म्हणून शहरात जनजागृतीसाठी रथ तयार करण्यात आला असून रथाला हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

वीज अधिनियमानुसार स्मार्ट मीटर बसविणे किंवा न बसविणे हा सर्वस्वी ग्राहकाचा अधिकार असताना महावितरण कंपनीकडून परस्पर स्मार्ट मीटर बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय ग्राहकांच्या हिताविरोधी आणि गैरसोयीला निमंत्रण देणारा असल्याची तक्रार करुन प्रीपेड मीटरला विरोध करण्यासाठी समितीतर्फे लढा देण्यात येत आहे. त्यानुसार या मीटरविरोधात जनजागृती करण्यासाठी रथ तयार करण्यात आला आहे. यानिमित्ताने समितीचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन स्मार्ट मीटर विरोधात हरकती नोंदवून घेणार आहेत. संपूर्ण मालेगाव शहरात हा रथ फिरवला जाणार असून किमान एक लाख ग्राहकांच्या हरकती नोंदवून त्या मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात येणार आहेत. जनजागृती रथाला हिरवा झेंडा दाखविण्याप्रसंगी समितीचे आर. के. बच्छाव, राजाराम जाधव, प्रमोद शुक्ला, कैलास तिसगे, राकेश भामरे, दिनेश ठाकरे उपस्थित होते. सागर पाटील यांनी रथ काढण्यामागील भूमिका मांडली. यावेळी समितीचे क्रांती पाटील, बिपिन बच्छाव, दिनेश पाटील, अनंत भोसले, मयूर वांद्रे, मनोज जगताप आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# मतदारांनी मतदान यादीत नाव असल्याची खात्री करावी : जिल्हाधिकारी डॉ. पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**मेहकर :** भारत निवडणूक आयोगाने आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी दि. 1 जुलै 2024 या अर्हता दिनांकावर आधारीत मतदारयाद्यांचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्याचे घोषित केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी मतदारयादीत आपले नाव असल्याची खात्री करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. या पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. 25 जुलै 2024 रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर सर्व विधानसभा मतदारसंघ व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या स्तरावर प्राप्त दावे आणि हरकती स्विकारून निकाली काढल्यानंतर अंतिम मतदारयादी दि. 20 ऑगस्ट 2024 रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या पुनरिक्षण कार्यक्रमाच्या वेळापत्रकानुसार मंगळवार, दि. 25 जून ते बुधवार, दि. 24 जुलै 2024 पर्यंत पूर्व पुनरिक्षण कार्यक्रमात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याद्वारे प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी,मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण व प्रमाणीकरण, मतदारयादी, मतदार ओळखपत्रातील त्रुटी दूर करणे, आयोगाच्या मानकानुसार छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे, अस्पष्ट, अंधुक छायाचित्र बदलून त्याऐवजी मतदाराकडून योग्य छायाचित्र प्राप्त करून मतदारयादीत सुधारणा करणे, तसेच विभाग, भाग यांची नव्याने रचना, मतदानकेंद्राच्या सीमांची पुनर्रचना, मतदान केंद्राच्या यादीस मान्यता घेणे, कंट्रोल टेबल अद्यावत करणे, नमुना 1 ते 8 तयार करणे, दि. 1 जुलै 2024 अर्हता दिनांकावर आधारीत एकत्रित प्रारूप यादी तयार करण्यात येणार आहे.

पुनरिक्षण कार्यक्रमात गुरुवार, दि. 25 जुलै 2024 रोजी एकत्रिकृत प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करणे, गुरूवार, दि. 25 जुलै 2024 ते शुक्रवार, दि. 9 ऑगस्ट 2024 दरम्यान दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी राहणार आहे. दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी निश्चित केलेले शनिवार व रविवार रोजी विशेष मोहिमांचा कालावधी राहणार आहे. सोमवार, दि. 19 ऑगस्ट 2024 पर्यंत दावे व हरकती निकालात काढणे, अंतिम प्रसिद्धीसाठी आयोगाची परवानगी मागणे, डाटाबेस अद्यावत करणे आणि पुरवणी याद्यांची छपाई करण्यात येणार आहे. मंगळवार, दि. 20 ऑगस्ट 2024 रोजी मतदारयादीची अंतिम प्रसिद्धी करण्यात येणार आहे. पुनरिक्षण कार्यक्रमानुसार दि. 1 जुलै 2024 रोजी वयाची 18 वर्षे पूर्ण होणारे आणि अद्याप मतदार नोंदणी केलेली नसलेल्या युवाना मतदार नोदणीची संधी प्राप्त होणार आहे. त्यानुसार नागरिकांनी मतदार नोंदणी अर्ज ऑनलाईन स्वरूपात VOTERS. ECI.GOV.IN आणि वोटर हेल्पलाईन ॲपचा उपयोग करून सादर करू शकतात. ऑफलाईन स्वरूपात संबंधित बीएलओ आणि संबंधित तहसील कार्यालयाशी संपर्क साधून नोंदणी करता येईल. सदर अर्ज आणि लिंक मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या CEO.MAHARASHTRA. GOV.IN आणि BULDHANA.NIC.IN या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. दि. २३ जानेवारी २०२४ आणि दि. 4 एप्रिल 2024 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदार याद्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या CEO.MAHARASHTRA.GOV.IN आणि BULDHANA.NIC.IN संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. मतदारांनी मतदाता सेवा पोर्टल या संकेतस्थळावर ELECTORALSEARCH. ECI.GOV.IN जाऊन यादीतील आपले नाव तपासावे. सर्व तपशील योग्य असल्याची खात्री करावी. आपल्या मतदारयादीतील तपशिलामध्ये दुरूस्ती असल्यास कार्यक्रमानुसार नमुद कालावधीत संपूर्ण कार्यवाही करावी. तसेच नव्याने नाव नोंदणीस पात्र नागरिक, लग्न होऊन गावात आलेल्या महिला, गावात कायमस्वरूपी नव्याने वास्तव्यास आलेले नागरिक यांची नाव नोंदणी केली जाणार आहे. दि. 25 जून 2024 ते दि. 24 जुलै 2024 या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याद्वारा प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत बीएलओ घरी येणार असून याआधी अनावधनाने मतदारयादीतून नावाची वगळणी झाली असल्यास बीएलओ यांच्याकडे किंवा ऑनलाईन स्वरूपात नमुना 6 भरून मतदार नोंदणी करता येणार आहे. नागरीकांना मतदार नोंदणीसंदर्भात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा संपर्क केंद्र टोल फ्री क्रमांक 1950 कार्यान्वित करण्यात आला आहे. उपरोक्त कालावधीमध्ये नागरिकांनी मतदार नोंदणी करण्यासाठी संबंधित तहसिल कार्यालय, बीएलओ यांच्या सोबत संपर्क साधून आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदारयादीमध्ये नाव समाविष्ट असल्याची मतदारांनी खात्री करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे



# भारतमातेचे महान सुपुत्र डॉ.शामाप्रसाद मुखर्जी

## काँग्रेसी विचारवाद्यांनी योगदानाचे महत्व देशासमोर येऊ दिले नाही

आधुनिक केसरी




राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

***भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदर तथा मिळाल्यानंतर हा देश अखंड राहिला पाहिजे आणि देशाच्या सीमारेषेच्या आत कुणालाही, कुठेही जाण्याचा अधिकार असला पाहिजे. शेवटच्या माणसाचं कल्याण डोळ्यासमोर ठेवुन राज्य कारभार करताना देशातील उद्योग आणि शेतकरी शिवाय शिक्षण यात सुधारणा कशा कराव्यात? हे तत्कालीन काळात जनसंघाचे पहिले संस्थापक अध्यक्ष डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांनी स्पष्ट आणि परखड बोलण्यातुन व आपल्या लेखणीतुन अनेकदा दाखवुन दिलं. जम्मु काश्मिरला विशेष दर्जा देवु नका असं म्हणत असताना तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष लियाकत खान यांच्यातल्या करारानुसार काश्मिरमध्ये विशेष अधिकार दिले.***

जे डॉ.शामाप्रसाद यांना मान्य नव्हतं. भारतामध्ये एक झेंडा एक पंतप्रधान व एकच संविधान असावं असा त्यांचा विचार होता. आपल्याच देशात काही भागात जाण्यासाठी परमिट लावणे ही संकल्पना त्यांना मान्य नव्हती. म्हणुन तत्कालीन काळात काश्मिरच्या दौऱ्यावर विना परमिट ते गेले होते. अर्थात शामाप्रसाद मुखर्जी यांचं देशाच्या जडणघडणीतलं योगदान शब्दात मांडता येणार नाही. पण कदाचित पश्चिम बंगालमध्ये त्यांचा जन्म झाला नसता तर आज हे राज्य कदाचित परकियांच्या शक्तीखाली गेले असते. प्रखर राष्ट्रभक्तीच्या विचाराने प्रेरित असलेले हे व्यक्तिमत्व ज्यांनी भारतमातेच्या अखंडतेसाठी आपलं बलिदान दिलं. पण देश जणुकाही आम्ही घडवला आणि आम्हीच खरे भारताचे तारणहार या विचारातुन तब्बल साठ वर्षे देश चालवणाऱ्या काँग्रेसी विचारसरणीने अशा महान सुपुत्राचं योगदान देशासमोर कधीच येवु दिलं नाही. कारण तत्कालीन काळात अगदी स्व. इंदिरा गांधी नव्हे राजीव गांधी इथपर्यंत माध्यमाची मुस्कटदाबी करत त्यांनी विरोधकांच्या विचाराला संधी दिली नाही. म्हणुन शामाप्रसाद मुखर्जी यांची ओळख वेगवेगळ्या आयामाने आज देशाच्या नव्या पिढीसमोर आणण्याची गरज आहे.

डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांचा जन्म 1901 साली पश्चिम बंगालमध्ये कलकत्ता येथे झालेला आहे. त्यांच्या वडिलांचे नाव आशुतोष मुखर्जी. ते पण शिक्षक व बुद्धीमान होते. कलकत्ता विद्यापीठात पदवी घेतल्यानंतर 1926 ला विद्यापीठ सिनेट सदस्य बनले. 1927 ला बॅरिस्टर पदवी मिळाली आणि वयाच्या 33 वर्षातच कलकत्ता युनिवर्सिटीचे कुलगुरू पदी त्यांची नियुक्ती झाली. वास्तविक पाहता देशाच्या इतिहासात एवढ्या कमी वयात कुलगुरू पदाचा बहुमान अद्यापही त्यांच्याच नावावरही आहे. शिक्षणात आमुलाग्र बदल करताना गरिबाच्या लेकरांना शिक्षण मिळाले पाहिजे. अनेक सुधारणा त्यांनी केल्या. कालांतराने राजकिय प्रवाहात उतरून विधानसभा निवडणुक त्यांनी काँग्रेस पक्षाकडुन लढवली आणि जिंकली. मात्र त्या काळात काँग्रेस सोबत त्यांचे विचार पटले नाहीत. त्याचे कारण शामाप्रसाद हे प्रखर राष्ट्रवादी, मानवतावादी विचाराचे होते. हा देश अखंड राहिला पाहिजे. अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे काँग्रेस सोबत नेहमीच मतभेद झाले. राष्ट्रहितासाठी परखड आणि स्पष्ट भुमिका ते घ्यायचे. तत्कालीन काळात त्यांनी आपल्या आमदारीकीचा राजीनामाही दिला होता. त्यानंतर दोन वेळा अपक्ष म्हणुन निवडुन आले. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या



नेतृत्वाखाली केंद्रिय मंत्रीमंडळातही अगदी थोड्या कालावधीसाठी शामाप्रसाद मुखर्जी कॅबिनेट मंत्री म्हणुन त्यांनी काम केले. पंडित नेहरू यांच्या सोबत त्यांचे वैचारिक मतभेद नेहमीच होत. कारण प्रखर राष्ट्रवाद आणि नेहरूजींनी जम्मु काश्मिरला दिलेला विशेष अधिकार ही कल्पना त्यांना आवडली नाही. सुरूवातीपासुनच त्यांनी एक देशमें दो निशान, दो विधान और दो प्रधान नही चलेंगे अशी कडवी भुमिका घेतली होती.राष्ट्रीय एकता व अखंडता हा त्यांच्या जीवनाचा मुख्य अजिंडा होता. आपल्या देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकांना देशाच्या सीमारेषेत कुठे पण जाण्याचा अधिकार असला पाहिजे. पण काश्मिरला विशेष अधिकार दिल्याने तिथे जाण्यासाठी त्यांच्या प्रशासकाची परवानगी घ्यावी लागत असे. हे शल्य त्यांना सतत मनात बोचत होतं. 8 मे 1953 ला परवानगी न घेता दिल्लीहुन ते थेट काश्मिरला रेल्वेने गेले. विशेष म्हणजे हम जम्मु काश्मिर बिना अनुमती से जाए यह हमारा मुलभुत अधिकार होना चाहिए अशा प्रकारची घोषणा त्यांनी जालिंधर येथे केली होती. अर्थात निधड्या छातीचे शामाप्रसाद असल्याने भारतमातेच्या रक्षणासाठी त्यांनी माघार घेतलीच नाही. त्यांनी श्रीनगर येथे पाय ठेवताच त्यांना अटक झाली. तेथे जेलमध्ये टाकण्यात आले. काही दिवसानंतर सुटका झाली. मात्र 22 जुनला त्यांची तब्येत खराब झाली आणि 23 जुनला अगदी रहस्यमय त्यांचा मृत्यू झाला. वास्तविक पाहता त्याचे गुढ अद्याप उकललेले नाही. पंडित नेहरू आणि शामाप्रसाद यांच्यात मतभेद होण्याचं कारण केवळ राष्ट्रभक्तीच होय. नेहरू आणि पाकिस्तानचे प्रधानमंत्री लियाकत अली यांच्यात झालेला करार तो मुखर्जी यांना मान्य झाला नव्हता. म्हणुन 1950 ला केंद्रिय मंत्री पदाचा राजीनामा त्यांनी दिला होता. मात्र देश वाचवला पाहिजे. अखंडता आणि बंधुभाव असे अनेक प्रश्न मनाला बोचत होते. दरम्यानच्या काळात तत्कालीन संघसरचालक गुरू गोलवलकर गुरूजी यांच्याशी विचारविनिमय करून 21 ऑक्टोबर 1951 ला राष्ट्रीय जनसंघाची स्थापना केली. त्याचं कारणही राजकिय व्यवस्थेच्या माध्यमातुन देशाची घडी टिकवली पाहिजे आणि काँग्रेस या देशाचे तुकडे तुकडे करू पाहत आहे. त्यातुनच जनसंघाची स्थापना त्याचवेळी 1951-52 ला लोकसभेची निवडणुक लढवली ज्यातुन तीन खासदार जनसंघाचे निवडुन आले. त्याच काळात जनसंघाच्या वतीने दिल्ली नगर पालिकेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस विरोधात प्रमुख पक्ष म्हणुन निवडणुक लढवली. पण काँग्रेसने त्या काळातसुद्धा धनशक्ती आणि दारू यांचा उपयोग राजकारणात केला असा आरोपही संसदेत मुखर्जी यांनी त्यांच्या भाषणात केला होता. त्यावर संसदेत फार मोठा गदारोळ झाला होता. माफी मागावी अशी काँग्रेसनं मागणी केली. मुखर्जी यांनी माफी मागितलीच नव्हती. अनेक राजकिय पैलु मुखर्जी यांचे तत्कालीन काळात आजच्या राजकारणात दिसुन येतात. आज आघाड्याचं राजकारण याची खऱ्या अर्थाने सुरूवात मुखर्जी यांच्या काळातच कदाचित ते जनक असेही म्हणता येईल. कारण काँग्रेस विरोधात तेव्हा राष्ट्रीय जनतंत्र पार्टी 32 प्रादेशिक पक्षांना एकत्रित करून त्यांनी निर्माण केली होती. मागे वळुन पाहताना अखिल भारतीय हिंदु महासभेचे कार्यकारी अध्यक्ष पण 1944 ला ते झाले होते. काश्मिरमध्ये 370 कलमान्वये दिलेले विशेष अधिकार हे बाजुला करा या मागणीस्ााठी त्यांनी केलेला संघर्ष त्यानंतर संघ परिवार, जनसंघ, जनता पार्टी आणि मग संपुर्ण राजकिय पटलावर हा विषय राहिला. विद्यार्थी परिषद असेल, हिंदु महासभा असेल, भाजपा असेल किंवा परिवारातील सर्व विचाराने 370 कलमाचा विरोध मुखर्जी यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन सतत केला. पण केवळ मताच्या राजकारणासाठी काँग्रेसने हे कलम कधी हाटवले नाही. देशाच्या राजकारणात सत्तेच्या पाळण्यात भाजपाचा जन्म 1914 साली झाला. जे स्वप्न 1953साली शामाप्रसाद मुखर्जी यांनी पाहिलं नव्हे काश्मिरमध्ये जावुन बलिदान दिलं ते स्वप्न देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 370 कलम हाटवुन काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक आहे. हे कृतीतुन दाखवुन दिलं. जिथे संधी मिळाली तिथे काम करताना मुखर्जी यांनी दुरदृष्टी डोळ्यासमोर ठेवुन केलेले बदल देशहिताचे आणि मानवतेच्या जीवाचे रक्षण करणारे निश्चित्‌ आहे. मात्र अनेक वर्षे काँग्रेसनं त्यांचं योगदान देशासमोर येवु दिलं नाही. कारण प्रसारमाध्यमे सुद्धा तत्कालीन काळात काँग्रेसच्या विचारावर चालत होती. ज्याला 2014 चा सुर्य उगवला आणि तदनंतर डॉ. शामाप्रसाद मुखर्जी कोण होते? त्यांचं बलिदान कशासाठी? त्यांचे विचार काय?हे खऱ्या अर्थाने भारतीयांच्या विशेषतः नव्या पिढीच्या डोळ्यासमोर आले.

# आवर्जून बघावे असे जळगावचे 'गांधी तीर्थ'

आधुनिक केसरी


***मानवाच्या ज्ञान प्राप्तीचा प्रवास सातत्याने सुरू असतो. अर्थात त्यासाठी कान, नाक, डोळे आदी इंद्रिये उघडी ठेवावी लागतात. वाचनासोबतच भटकंती आवश्यक लागते. नेमका हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून स्मृतीशेष मा. भवरलाल जैन यांच्या संकल्पनेतून जळगाव येथे उभारलेल्या 'गांधी तीर्थ' अर्थात गांधी रिसर्च फाउंडेशनला आम्ही पारिवारिक भेट दिली.***



नेहमीप्रमाणे यासंदर्भात दोन छायाचित्रे आणि चार ओळी माझ्या हक्काच्या सोशल मीडियावर मी सहज लिहिल्या असत्या. मात्र तसे न करता मुद्दाम हे विस्तृत लिहित आहे. गांधी रिसर्च फाउंडेशनपूर्वी मी अशा अनेक राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्थळांना/प्रकल्पांना/स्मारकांना भेटी दिल्या आहेत. तिथले व्यवस्थापन, परिसर, स्वच्छता, कामाचे ढोबळ स्वरूप तर नक्कीच समजून घेतले आहे. मात्र या सर्वांहून मला भावले ते तो जळगाव येथील 'गांधी तीर्थ' या ठिकाणच्या इमारतीचे बांधकाम सुंदर आणि अतिशय कल्पक आहे. एका मोठया उजाड डोंगराचे सुंदर लँडस्केपींग केलेले आहे. सारा परिसर हिरवळ आणि सुंदर झाडीने वेढला आहे. पर्यटकांसाठी 200 रुपये प्रवेश फी आहे. कार पार्किंग मोफत आहे. चहा, नाश्ता आणि जेवणासाठी उपहारगृह आहे. त्याचे दर सुद्धा माफक आहेत. या ठिकाणी ऑडिओ, व्हिडिओ व पेंटिंग्सद्वारे गांधीजींचे जीवनकार्य समजावून सांगण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला आहे. हे स्मारक बघण्यासाठी किमान तीन तास लागतात. त्यानंतर नाश्ता, चहा, जेवण, परिसर भटकंती फोटोग्राफी (सेल्फी!) यासाठी आपण सोयीप्रमाणे इथे अधिक वेळ देऊ शकता. इथले व्यवस्थापन अतिशय चांगले आहे. कर्मचारी प्रेमळ आहेत. पर्यटकांना ते प्रेमाने बोलतात, सहकार्य करतात. जैन उद्योग समूहाचा पसारा फार मोठा आहे. तो जगभर पसरला आहे. अवघ्या 7000 रुपयात सुरू झालेला हा उद्योग आज 7000 कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याची माहिती मिळाली. अर्थात यासाठी स्मृतीशेष भवरलाल जैन व त्यांची तीन मुले अनुक्रमे अशोक, अतूल आणि अजित जैन यांची कठोर मेहनत आहे. जवळपास 10 हजार लोकांना या उद्योग समूहात प्रत्यक्ष रोजगार मिळालेला आहे. बाकी अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती खूप मोठी आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात या प्रकल्पाने मोठी क्रांती घडवली आहे. जैन उद्योग समूहाच्या प्रोडक्टची कायमस्वरूपी प्रदर्शणी या परिसरात लावलेली आहे. 'अनुभूती' या स्वतंत्र इमारतीमध्ये या उद्योग समूहाला मिळालेल्या आजपर्यंतच्या विविध पुरस्कारांची प्रदर्शणी आहे. याच इमारतीत भवरलालजी जैन यांचा छोटासा पुतळा आहे. देशांतर्गत आणि देशाबाहेर जैन उद्योग समूहाचे अनेक प्रकल्प आहेत. जैन हिल्स सुमारे 2000 एकराचा परिसर आहे. ज्यात टिश्यू कल्चर प्रकल्प, शेती संशोधन, गांधी स्मारक, प्रशिक्षण केंद्र, गोशाळा, वृद्धाश्रम आणि बरेच काही आहे. इथले वेस्ट मॅनेजमेंटसुद्धा बेस्ट आहे. त्यावर स्वतंत्र लिहायला हवे. शौचालये सुद्धा बघण्यासारखी आहेत. वेळेअभावी आम्हाला गोशाळा, वृद्धाश्रम आणि टिशू कल्चर प्रकल्प बघता आला नाही. भविष्यात पुन्हा एकदा जाऊन हे बघण्याचा आमचा नक्कीच विचार आहे.

**जाता जाता :** गांधी हे एक तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाचे जेवढे समर्थक आहेत तेवढेच विरोधक देखील आहेत. सनातनी वैदिक ब्राह्मणी परंपरेचे वारस आज गांधीजींना पाण्यात बघतात. ते जितका गांधीजींचा द्वेष करते तितकाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सुद्धा द्वेष करतात. दुसरीकडे काँग्रेसच्या बहुतांश पुढारीवर्गाच्या सरंजामी वागणुकीचे खापर लोक साधं जीवन जगणाऱ्या गांधीजीवर हकनाक फोडतात. गांधीजींबद्दल सत्याऐवजी असत्य नथुरामी शक्तीने आज जास्त पसरवले आहे. आणि गांधी-आंबेडकर या वैचारिक संघर्षात आंबेडकरवादी गांधीजींवर बेहद तुटून पडतात. खरेतर ही महान माणसे होती. दोघांचीही आभाळाएवढी उंची होती. त्यांच्यात कोण मोठे आणि कोण छोटे? हा प्रश्न मला नेहमीच गैरलागू आणि कळलाव्या वाटतो. गांधीजी सतत चेंज होत राहीले हे मला जास्त महत्वाचे वाटते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भेटीचीच ती फलश्रुती होती. इथल्या सांस्कृतिक संघर्षाचं आजचं स्वरूप मला नथुरामी विरुद्ध गांधी-आंबेडकरी असंच दिसतं. अशा या सांस्कृतिक संघर्षात माझी बाजू माणूसमाऱ्या नथुराम विरोधातली आहे.

**आवाहन :** आपल्यापैकी प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी जळगावच्या या गांधी तीर्थाला नक्की भेट द्यावी. या प्रकल्पासोबतच जैन उद्योग समूहाचीसुद्धा माहिती घ्यावी. हा प्रकल्प खरोखरच बघण्यासारखा आहे. खासकरून आंबेडकरीवादी मंडळींनी तर आवर्जून या ठिकाणी एकदा तरी भेट दिली पाहिजे.. ते यासाठी की बाबासाहेबांचे आभाळाएवढे कार्य असून सुद्धा ते लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण यासारखे एखादे सुंदर स्मारक आजवर का निर्माण भरू शकलो नाही? हा प्रश्न या ठिकाणी आल्यावर त्यांना पडू शकतो. सोबतच स्मारक कसे असावे? याचा वस्तूपाठही इथेच मिळू शकतो. रचनात्मक कार्याचा पर्वत उभारणारे स्मृतीशेष भवरलाल जैन यांचं प्रेरणादायी जीवन कार्य सुद्धा इथेच आपल्याला बघायला मिळेल. हा परिसर सोडताना मला गेटवर लिहिलेला 'LEAVE THIS WORLD BETTER THAN YOU FOUND IT' हा मा. भवरलाल जैन यांचा संदेश खूप भावला.



रविंद्र साळवे
संपर्क क्र. 9822262003

# सेवासदन एक स्तुत्य आणि संवेदनशील उपक्रम

## जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर : सेवासदनचा पाचवा वर्धापन दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**गोपाल सातपुते**

**हिंगोली :** सेवासदन मुलांचे वसतिगृह मागील पाच वर्षापासून जिजामाता नगर हिंगोली या ठिकाणी धनराज कदम व मीरा कदम चालवतात. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुले आई-वडिलांचे छत्र हरवलेली निराधार मुले 70 मुलांचा सांभाळते करतात. या सेवासदन वसतिगृहाचा पाचवा वर्धापन दिन दि.23 जून 2024 रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विशेष कार्यक्रम म्हणजे युवा भूषण पुरस्कार सोहळा हा होता. समाजातील विविध क्षेत्रात अतुलनीय कार्य करणाऱ्या युवकांचा युवाभूषण पुरस्कार देऊन साथ फाउंडेशन व सेवा सदन परिवाराच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच या कार्यक्रमात सेवासदंच्या मुलांनी दिंडीचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच आजपर्यंत विविध क्षेत्रात शिक्षण घेत असलेल्या सेवासदन मधील मुलांनी आपले भावपूर्ण मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रस्ताविक मीरा कदम यांनी केले. सेवासदन हा अतिशय स्तुती आणि संवेदनशील उपक्रम कदम दाम्पत्य राबवत आहे. शासनाचे कुठलीही अनुदान नसताना हे कार्य करणे खरोखरच दिव्य आहे. समाजातील निराधार लेकरांची वेदना ओळखून त्यावर ठोस काम करणे हे अतिशय जिकरीचे काम आहे. हे कार्य अतिशय जबाबदारीने आणि उत्कृष्ट पद्धतीने चालवणे यासाठी फार मोठे धाडस लागते.. समाजातील दानशूर व्यक्तींनी या कार्यासाठी पुढे आले पाहिजे असे मत जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांनी सेवासदनच्या या कार्याचे भरभरून कौतुक केले . सेवासदन मधून खरोखरच एक उज्वल भविष्य घडत आहे. सेवासदन मधील मुले अतिशय सुसंस्कारित आणि नम्र आहेत या कार्यासाठी माझे सतत सहकार्य राहील समाजातील विविध घटकांनीही या कार्याच्या वाटचालीसाठी सहकार्य करावे असे मत कामाजी पवार यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन धनराज कदम यांनी केले. या कार्यक्रम प्रसंगी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष हिंगोली पप्पू चव्हाण लीनाताई जाधव, प्रकाश सोनी, फुलतांबकर सर, वंदना काबरा, ज्योती वाघमारे वैशाली वाघ, डॉ. शिवाजी गीते ,डॉ. दीपक मोरे, द्वारकादास सारडा, रोहित कंजे, डॉ. विठ्ठल रोडगे ,



डॉ. यशवंत पवार विशाल मुळे, डॉ. श्याम जाधव , जगन टेकाळे, सुधाकर सोनवणे , प्रशांत मांडवकर तसेच सेवासदन परिवाराशी संबंधित सर्व संवेदनशील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी धनराज कदम मीरा कदम, गुणवंत गणगे, स्वाती गणगे , कवी शिवाजी कऱ्हाळे, अमर गायकवाड, अमर साखरे , विलास कोल्हाळ , गणेश गायकवाड तसेच सेवासदन मधील सर्व मुलांनी तसेच सेवासदन परिवाराशी संबंधित सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

# शाळाबाह्य मुलांना शैक्षणिक प्रवाहात कधी आणणार?

## जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा कधी सुधारणार?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** गेल्या अनेक वर्षापासून जिल्हा परिषद शाळेतल्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यात यश मिळाले नाही. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची घटत जाणारी पट संख्या पाहता शिक्षकांची नोकरी जाण्याची भीती व्यक्त होत आहे. हीच नामुष्की टाळण्यासाठी धर्माबाद तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांची धावपळ सध्या सुरू झाली आहे. 2024-2025 चे शैक्षणिक सत्र सुरू होताच जिल्हा परिषदचे शिक्षक घरोघरी जाऊन मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी काही धर्माबाद तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये पालकांची मानधरणी शिक्षक करतांना दिसत आहेत.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी व बळकटी आण्यासाठी अनेक धोरणात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद शाळांना शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शासन स्तरावरून मोठ्या प्रमाणात पर्यंत सूरू आहेत,मात्र काही शाळेचा अपवाद वगळता बहुसंख्य जिल्हा परिषद शाळांना अपेक्षित यश अद्याप मिळालेले नाही,दर्जेदार शिक्षण मिळत नसल्याची ओरड कायम असून जिल्हा परिषद शाळांमध्ये मुलांना पालकांकडून पाठवण्यास नकार मिळत आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद शाळेचे शिक्षकांचेच मुले खाजगी इंग्रजी शाळांमध्ये शिक्षण घेत आहे.जिल्हा परिषदेच्या शाळांना विद्यार्थी मिळेनासे झाल्याने तुकड्या संख्या कमी होऊन शाळेच्या शिक्षकांवर नोकरीवरून हात धुण्याची वेळ आली आहे.जिल्हा परिषदेचे शिक्षकांची मुले खाजगी,इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत.जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थी शोधणार तरी कोणत्या मुलांना हा खरा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.जिल्हा परिषद शाळेच्या तुकड्यांची संख्या कमी झाल्याने मला नोकरी सोडावे लागले किंवा मला राजीनामा देवावे लागेल,या भीती पोटी जिल्हा परिषदेच्या शिक्षकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.त्याच्यामुळे धर्माबाद तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागामध्ये त्यांना विधार्थी घडवण्या पेक्षा स्वतःची नोकरी वाचवण्यात जास्त भर देताना दिसत आहेत.धर्माबाद तालुक्यात गावागावात,घरोघरी जाऊन जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांना विद्यार्थ्यांची शोध मोहीम चालू करतांना दिसत आहेत.सर्व जिल्हा परिषदेतील शिक्षकांची मुले तालुका व जिल्हाच्या ठिकाणी खाजगी,इंग्रजी माध्यमांच्या सीबीएससी व इंटरनॅशनल बोर्डाच्या शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. पण तोच विचार आपल्या शाळेमध्ये शिकणाऱ्या, शिकवणाऱ्या विद्यार्थ्याला घडवण्याचे कधी विचार करतांना दिसत नाही.ही बाब धर्माबाद तालुक्यातील पालकांना जिल्हा परिषद शाळे बाबत व शिक्षकांवर नाराजीचे सूर पाहताना दिसत आहे. त्यामुळे धर्माबाद तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शालेय पोषण आहार दिला जातो पण त्याच्यामध्ये सुद्धा मुख्याध्यापक,शिक्षक,यांनी गुतेदार यांना हाताशी धरून शालेय पोषण आहार निष्कर्ष दर्जाचे आहार मुलांना देतात.एक प्रकारे शाळा हे आहाराचे भ्रष्टाचाराचे अड्डा बनत आहे,असेच म्हणावे लागेल,या शिवाय मोफत गणवेश पाठ्यपुस्तकेही दिली जातात. मात्र क्षणिक दर्जा सुधारण्यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, कोणीच लक्ष देयायला तयार नाही.आजही पालक आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत पाठवण्यासाठी तयार होत नाहीत.त्यामुळे जिल्हा परिषद शाळेचे दर्जा सुधारण्यासाठी लोकप्रतिनिधी, राजकीय अराजकीय सामाजिक चळवळ चालवणारे या सर्वांनी मिसळून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आम्ही ज्या शाळेत शिक्षणाचे धडे देत होतो त्याच शाळेत आमची मुले ही शिकत होती .आता मात्र परिस्थिती बदलली आहे . जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची मुले इंग्रजी शाळेत शिकत आहेत .शिक्षक आणि पालक यांच्यात दुरी निर्माण झाल्याने त्याचा परिणाम जाणवत आहे .

**शंकरराव जाधव निवृत्त शिक्षक**



काही वर्षापूर्वी शहरी,ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळा हाच आधार होता .पूर्वी जिल्हा परिषदच्या शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीमुळे पूर्वी जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थी चांगल्या चांगल्या पदावर काम करीत आहेत . मात्र सध्या इतर खाजगी इंग्रजी शाळांकडे पालकांचा कल जास्त प्रमाणात वाढला आहे . त्यामुळे जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारणे गरजेचे आहे .

**अशोक पूजरवाडा सामाजिक कार्यकर्ते**

धर्माबाद तालुक्यात वेगवेगळ्या शासनच्या सेवेत असणारे कर्मचारी त्यांचे मुले खासगी शाळेत शिक्षण घेत आहेत .अनेक शिक्षक शासनाकडून निवासी भत्ता घेतात मात्र ज्या ठिकाणी शिकवले जात आहे .त्या ठिकाणी राहणे बंधन कारक आहे .ते तसे घडत नाही कारण शिक्षकांचे मुले हे जिल्ह्याच्या ठिकाणी खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत . त्याच्यामुळे शिक्षक ज्या ठिकाणी शिक्षण शिकवतात त्या ठिकाणी राहत नाहीत नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण अधिकारी यांनी लक्ष देऊन संबंधित शिक्षकांनावर कारवाही करून निलंबीत करावे

**गणेश गिरी शिवसेना उपजिल्हाप्रमुख ( उद्धव गट )**

जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी मुख्यध्यापक, शिक्षकांनी पर्यंत करणे गरजेचे आहे . पूर्वीच्या शिक्षकांप्रमाणे या शिक्षकांनी स्वत :च्या मुलांनाही जिल्हा परिषदेच्या शाळेत पाठवले तर जनसामान्यातील मत बदलून विद्यार्थी संख्या वाढण्यास मदत होईत, पूर्वी जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेतलेले विधार्थी आज शासकीय सेवेत मोठ मिठ्या पदावर कार्यरत आहेत .

**नागनाथ जिंकले काँग्रेस कार्यकर्ते**



# संत निवृत्तीनाथ दिंडीत आयुक्तांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करणारी श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांची पालखी सोमवारी सकाळी सिन्नरपर्यंत पोहचली. नाशिकजवळील पळसे येथील मुक्कामानंतर पालखी सिन्नरच्या दिशेने निघाली असता पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी सात किलोमीटर पायी चालत दिंडीची अनुभूती घेतली.

नाशिकरोड येथून रविवारी संत निवृत्तीनाथ महाराज यांची पालखी दिंडी दुपारच्या सुमारास मार्गस्थ झाली. पळसे गावात रात्री मुक्काम करून सोमवारी सिन्नरच्या दिशेने पालखी निघाल्यावर शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांनी दिंडीत प्रत्यक्ष सहभाग घेतला. कर्णिक यांनी डोक्यावर पांढरी टोपी, कपाळी गंध टिळा तर गळ्यात टाळ घेतले. उपायुक्त राऊत यांनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन हरी नामाचा गजर करत पळसे गाव ते चिंचोली गाव असे सात किलोमीटर पालखी सोहळ्यात सहभाग घेतला. वारकऱ्यांच्या भजनाला कर्णिक हे प्रतिसाद देत होते. सहायक आयुक्त संदीप मिटके, नाशिकरोड पोलीस ठाण्याचे निरीक्षक रामदास शेळके यांसह अन्य अधिकारीही दिंडीत सहभागी झाले होते.

# रस्त्यावर घाणपाणी व डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने नगरपरिषदला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतुर :** गेल्या दोन-तीन महिन्यापासून परिसर नगर परिषद कडून साफसफाई करण्यात आली नसल्यामुळे रस्त्यावर घाण पाणी व डासांचा प्रदुभाव वाढला असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्यामुळे परिसरातील नागरिकांनी नगरपरिषद जिंतूर यांच्याकडे तात्काळ साफसफाई करण्यासाठी निवेदन देण्यात आले.

मौलाना आझाद कॉलनी, करीमी मज्जिद परिसर, संतोषी माता मंदिर परिसर, साई मंदिर परिसर, बलसा रोड आदी भागात नगरपरिषद स्वच्छता विभागाकडून गेल्यात दोन ते तीन महिन्यापासून परिसर स्वच्छ करणे सोडा नाल्या साफसफाई करण्यासाठी ही स्वच्छता कर्मचारी फिरकले नाही सध्या या परिसरात जागोजागी कचरा व नाली भरून गेल्यामुळे रस्त्यावर घाण पाणी वाहत आहे यामुळे नागरिकांना रस्त्यावर चालणे सुद्धा कठीण झाले आहे तसेच सर्वात घाणीचे साम्राज्य असल्याने डासांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे यामुळे नागरिकांचा आरोग्य धोक्यात आले असल्याने परिसरातील नागरिकांनी नगरपरिषद जिंतूर यांच्याकडे तात्काळ परिसर स्वच्छ करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे निवेदनावर युवा कार्यकर्ते मोहसीन पठाण, एस के बबलू, स. रशीद स. अजीज, सय्यद गौसखान पठाण, अरबाज खान, मोहम्मद मुस्ताक, सय्यद अयुब, सय्यद अल्ताफ, शेख साबेर, समीरखान शेरखान, शेख लायक शेख इस्माईल आदींचे स्वाक्षरी आहेत.



# उमरगा-लोहारा विधानसभा मतदार संघातून निष्ठावंत शिवसैनिकाला मिळणार उमेदवारी ?

## एकनिष्ठ म्हणून गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर यांच्या नावाची चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** लोकसभा निवडणुकीनंतर आता सर्वच पक्षांना विधानसभेचे वेध लागले असून महायुती व महविकास आघाडीच्या वतीने आपापल्या परीने उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. उमरगा-लोहारा विधानसभा मदारसंघ महाविकास आघाडीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडेच आहे. महायुतीकडून शिंदे गटाचे विद्यमान आमदार ज्ञानराज चौगुले हेच उमेदवार असतील यात शंका नाही मात्र महविकस आघाडीकडून निष्ठावंत शिवसैनिक म्हणून १९९० पासून शिवसेना पक्षात एकनिष्ठपणे काम करणारे गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी  शिवसैनिकांकडून जोर धरत आहे. २००९ साली शिवसेनेकडून उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघ राखीव झाल्यानंतर आमदार ज्ञानराज चौगुले आणि गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर हे दोनच उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार होते. त्यावेळी पक्षश्रेष्ठींनी चौगुले यांना उमेदवारी जाहीर केली व विलास व्हटकर यांना पुढच्या वेळी संधी देण्यात येईल असे सांगण्यात आले. २०१४, २०१९ साली देखील पक्षाने



विद्यमान म्हणून चौगुले यांची उमेदवारी कायम ठेवत पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म दिला. २०१९ ला विलास व्हटकर यांनी मातोश्री येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेवून उमेदवारीचे मागणी केली होती. तेंव्हाही विद्यमान आमदार म्हणून चौगुले यांनाच उमेदवारी देण्यात आली. पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानत व्हटकर यांनी तीन वेळेस उमेदवारी माघारी घेत पक्षाच्या कार्यात सक्रिय राहिले. चौगुले यांनी बंडखोरी करत शिंदे गटात गेल्याने ठाकरे गटाकडून विलास व्हटकर यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी शिवसैनिकांमध्ये जोर धरत आहे. विलास व्हटकर यांचा उमरगा लोहारा विधानसभा मतदासंघात चांगला जनसंपर्क आहे. दोन्ही तालुक्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन करण्यात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. सर्वसामान्य शिवसैनिकांच्या अडचणीला धावून येणारा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. मतदासंघात विविध सामाजिक उपक्रम व कार्यक्रमाच्या माध्यमातून ते नेहमी जनतेच्या संपर्कात असतात. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ओमराजे निंबाळकर यांच्या प्रचारात सभा घेत त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला. येथील प्रचार संपल्यानंतर दक्षिण मध्य मुंबईचे उमेदवार अनिल देसाई यांच्या मतदारसंघात प्रचारार्थ सभा, कॉर्नर बैठका घेतल्या. त्यांचे अनिल देसाई यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. खा. ओमराजे निंबाळकर, संपर्कप्रमुख सुनील काठमोरे, जिल्हाप्रमुख कैलास पाटील, शिवसेना नेते बाबा पाटील यांचे ते विश्वासू असल्याचे सर्वश्रुत आहे. जील्हासंघटक दीपक जवळगे, शेतकरीसेना जिल्हाप्रमुख विजयकुमार नागणे, उमरगा तालुकाप्रमुख बाबुराव शहापूरे, लोहारा तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, उमरगा-लोहारा विधानसभाप्रमुख भगवान जाधव, उपजिल्हाप्रमुख सुरेश वाले, बसवराज वरणाळे, युवासेना तालुकाप्रमुख अजित चौधरी, उमरगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रणधीर पवार, माजी नगराध्यक्ष रज्जाक अत्तार, उपतालुकाप्रमुख सुधाकर पाटील, ज्येष्ठ शिवसैनिक डी.के. माने, उमरगा शहरप्रमुख राजेंद्र सूर्यवंशी, लोहारा शहरप्रमुख सलीम शेख, महेबुब गवंडी, जितेंद्र पोतदार, अप्पाराव गायकवाड, मारूती थोरे, दत्ता शिंदे यासारखी निष्ठावंत लोकांची साथ व्हटकर यांना आहे. सर्वांसाठी झोकून देवून काम करणारा कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे त्यामुळे जनतेत मिसळणार, शिवसैनिकांच्या अडी-अडचणीला धावून येणारा, तळागळातील सामान्य कार्यकर्त्याला बळ देणारा, हककचा उमेदवार म्हणून विलास व्हटकर यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी सर्वसामान्य निष्ठावंत शिवसैनिकातून जोर धरत आहे.



## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचितची जळगाव जामोद येथे बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**जळगांव जा :** लोकसभेच्या निवडणुकीनंतर वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुक ताकदीने लढवायच्या असे दोन दिवसांपूर्वी झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत निर्णय झाल्यानंतर बुलडाणा जिल्ह्यातील सर्वच मतदार संघात विधानसभा निवडणुक ताकदीने लढवायच्या त्या अनुषंगाने आज दिनांक २३ जुन २०२४ रोजी जळगाव जामोद येथिल  विश्राम गृहात जिल्हा प्रभारी प्रदिप वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली.

या बैठकीला जिल्हा समन्वयक डॉ. प्रविण पाटील, जिल्हा समन्वयक, राजाभाऊ भोजने, समन्वयक प्रा सोनेकर सर, समन्वयक राजुभाऊ शेगोकार, महिला आघाडी च्या जिल्हा अध्यक्षा विशाखाताई सावंग़,मा.जिल्हा महासचिव AD अनिल इखारे, युवा नेते विजय पोहनकर, यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये हजर होते यावेळी जिल्हा प्रभारी प्रदिप वानखडे यांनी आपले विचार मांडले ते म्हणाले की जळगांव जामोद मतदार संघ हा वंचित बहुजन आघाडीसाठी सुपिक मतदार संघ आहे हा मतदारसंघ संघ दोन वेळा दुसऱ्या क्रमांकावर राहुन अगदी कमी मतांनी उमेदवार पराभूत झाला आहे त्या करिता जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या मतदार संघाचा उमेदवार जाहीर केल्या जाईल जेणेकरून उमेदवाराला मतदार संघात भेटी गाठी घेण्यासाठी वेळ मिळेल व पुढे त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सुद्धा आजपासुनच कामाला लागा व पक्ष संघटन बांधनी करा अशा सुचना केल्यत जिल्हा समन्वयक डॉ प्रविण पाटील, राजाभाऊ भोजने,प्रा सोनेकर सर, राजुभाऊ शेगोकार, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा विशाखाताई सावंग़ AD इखारे यांनी सुद्धा आपले विचार मांडले या बैठकीत डॉ प्रविण पाटील ( मराठा), डॉ शिरेकार (माळी),विजय पोहनकर ( मायक्रो ओबीसी) शंकरराव इंगळे (कोळी) सलमान खान (मुस्लिम) प्रकाश भिसे (मायक्रो ओबीसी),भालतडक महाराज ( कुणबी) सचिन राऊत (माळी) यांच्यासह एकूण १४ अर्ज भरून घेण्यात आले अर्ज भरण्याची खास अट म्हणजे उमेदवार हा पक्षाचा आजिवन सभासद असणे गरजेचे आहे यावेळी अरुण पारवे,अताउल्ला खान,शहर अध्यक्ष आजम कुरेशी, सुनिल बोदडे, देवानंद दामोदर, पार्वताबाई इंगळे, सुनिता हेलोडे, विजय सातव सर, दादाराव अंभोरे,अनिल रणित, ज्ञानेश्वर कोकाटे, आशिष धुंदाळे, संचालक प्रशांत अवसरमोल, संतोष गवई, प्रविण तायडे, अमोल तायडे, आनंद गवई, जगदीश हातेकरसह असंख्य  जळगांव जामोद संग्रामपूर, शेगांव तालुक्यातील तालुका व शहर पदाधिकारी उपस्थित होते.

## शैक्षणिक वर्षाची सुरुवात वृक्षारोपण आणि कृतियुक्त संवर्धन संकल्पातून

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रीन क्लब, पंचायत समिती खंडाळा, तालुका उमेद महिला सक्षमीकारण कार्यक्रम आणि सामाजिक वनीकरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या समन्वयातून शैक्षणिक वर्ष 2024-25 चा प्रारंभ हा "वसा पर्यावरण संवर्धनाचा निश्चय वृक्षारोपण आणि जपणूकचा" या विधायक कृतीपूर्ण संकल्पनेतुन करण्यात आला.खंडाळा तालुका उमेद कार्यक्रम तालुका व्यवस्थापक प्रविण खुडे, सामाजिक वनीकरण महाराष्ट्र शासन विभाग कर्मचारी अर्चना जगताप, घाडगेवाडी सरपंच हिरालाल घाडगे आदी मान्यवरांच्या उपस्थित हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ.हणमंत जाधव आणि उप प्राचार्य डॉ.प्रतिभा पाटणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी खंडाळा तालुका उमेद महिला सक्षमीकरण कार्यक्रमाचे व्यवस्थापक प्रविण खुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की,"आजची तरुणाई मोबाईल मग्न आहे,आभासी जगात जगताना तो तात्पुरता आनंद शोधत आहे झाड किंवा रोप एक दिवसासाठी लावून त्याचा आभासी आनंद मिळवण्याऐवजी रोपट्या चे वृक्ष होतानाचे व्हिडीओ प्रेरणादायी ठरतील यासाठी वृक्ष पालक होऊन त्यांचे संवर्धन करा.असे आवाहन केले.सामाजिक वनीकरण विभाग महाराष्ट्र शासन विभागाच्या कर्मचारी अर्चना जगताप  म्हणाल्या की,तरुणाईने वृक्षारोपण विधायक संकल्प योग्य संगोपन आणि संवर्धनातून पूर्णत्वास न्यावा. घाडगेवाडीचे सरपंच हिरालाल घाडगे म्हणाले, आजच्या तरुणाईने विधायक कृतीतून समाज परिवर्तन करावे यासाठी वृक्षारोपण आणि संवर्धनाचा दृढ निश्चय सातत्यपूर्ण कृतीतून पूर्ण करावा.असे आवाहन केले.या समारंभाचे प्रास्ताविक व उद्देश राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा अमीर इनामदार यांनी केले की, वर्तमानात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरण असमतोल आणि हानी होत आहे,अवेळी पडणारा पाऊस, वाढती उष्णता, त्याचा मानवी जीवनावर होणारा विपरीत परिणाम यावर उपाय म्हणजे वृक्षारोपण आणि संगोपन ही विधायक कृती करण्याचा वसा शैक्षणिक वर्ष 2024-25 प्रारंभी आमच्या महाविद्यालय पदवी शिक्षण घेणारे विद्यार्थी विद्यार्थिनी आणि प्राध्यापक वृंद यांनी घेतला आहे.आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा प्रदीप मेंढापुरे, सूत्रसंचालन प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. भारती चव्हाण यांनी केले. यावेळी उमेद तालुका समन्वयक मनोज माने महाविद्यालय सर्व विषय शाखा विभागप्रमुख व प्राध्यापक वृंद,विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी भागवत बिरगड,साहिल शिंदे,अक्षय देशमाने,संदेश खताळ,अनिकेत गाढवे आदींनी परिश्रम घेतले.

## कारागृहातील कैद्यांनी फुलवली कोट्यवधीची शेती

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यभरातील कारागृहात शिक्षा भोगत असलेल्यांमध्ये सर्वाधिक शेतकरी वर्गातील कैद्यांचा समावेश आहे. शेतकरी कैद्यांनी शेतीत राबून तब्बल ४ कोटी ५५ लाख रुपयांचे शेतमालाचे उत्पादन घेतले आहे. सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्यांमध्ये पैठण कारागृह पहिल्या स्थानावर असून त्यानंतर विसापूर आणि नागपूर कारागृहाचा क्रमांक लागतो, अशी माहिती पुणे कारागृह महासंचालक कार्यालयाने दिली. मध्यवर्ती कारागृह म्हटले की सामान्य नागरिकांच्या मनात धडकी भरते. कुख्यात गुन्हेगारांचा भरणा असलेल्या कारागृहातील जीवनमानाबाबत विचार केल्यास अंगावर काटा उभा राहू शकतो. मात्र, महाराष्ट्र कारागृह महासंचालकांनी राज्यभरातील कारागृहांमध्ये शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांमधील सुप्त गुणांना वाव दिला आहे. हातून एखादा गुन्हा घडल्यानंतर आरोपीला तुरुंगातील चार भिंतीत आयुष्य जगावं लागते.

## जिजाऊ ज्ञानमंदिरात योग दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** येथील निसर्ग सौंदर्याने नटलेल्या जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूलमध्ये जागतिक योगदिन प्रात्याक्षिकासह विद्यार्थ्यांच्या सहभागाने उत्साहात संपन्न झाला. यावेळी युवा योगगुरू विठ्ठल कोळनुरे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रात्याक्षिकासह विविध योगासनाचे सादरीकरण केले. त्यांचे पाहून सर्व विद्यार्थ्यांनी योगासने करून दाखवली. आपले शारिरीक व मानसिक आरोग्य निरोगी राहण्यासाठी योग साधना किती महत्वाची आहे याचे मार्गदर्शन ही योगगुरु विठ्ठल कोळनुरे यांनी केले. चांगली स्मरणशक्ती व कुशाग्र बुद्धीमतेसाठी मानसिक आरोग्य ठीक असावे लागते. त्यासाठी सकाळी नियमित व्यायाम महत्वाचा आहे असे मार्गदर्शन यानिमित्ताने मुख्याध्यापक जगदीप जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड यांनीही जागतिक योग दिन व २१ जून हा दिवस सर्वात मोठा दिवस असून हा योगदिन जगभर साजरा केला जात आहे. आरोग्यम् धनसंपदा ... उद्याचे उज्वल भविष्याचे नागरिक आजच्या विद्यार्थ्यांचे चांगले आरोग्य असणे ही देशासाठी महत्वाची बाब आहे. निरोगी विद्यार्थीच उज्वल भविष्य घडवू शकतात. चांगला अभ्यास करून चांगले यश मिळवू शकतात हा विचार त्यांनी यावेळी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी यावेळी चांगला प्रतिसाद दिला व आनंद उत्साहात योगदिन साजरा झाला. संचालक ज्ञानोबा जोगदंड यांनी योग प्रशिक्षक विठ्ठल कोळनुरे व सहकारी आर्य रेड्डी सर यांचा सत्कार केला व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# मुखेड येथे संविधानरक्षक कृती समितीचा महामोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**मुखेड :** राज्यामध्ये शेतकरी कष्टकरी निराधार बेरोजगार शेतमजूर यांच्या संसारावर महागाईमुळे मरण अवकळा पसरली असून शासनाकडून मिळणाऱ्या पिक विमा, पिक कर्ज अनुदान, मिळणाऱ्या सुविधा, राशन, निराधारचे अनुदान, सामाजिक अनुदान या सर्व गोष्टी वेळेवर मिळत नाहीत मिळाल्या तरी तुटपुंजा कमीत कमी मिळत आहेत. त्यामुळे शेतकरी निराधार यांना न्याय मिळवून देण्यासाठी व मुखेड तालुक्यात विविध विकास कामात गैरव्यवहार होत असून या गैरव्यवहाराची चौकशी व्हावी यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथराव लोहबंदे यांच्या नेतृत्वाखाली संविधान रक्षक क्रती समितीच्या वतीने तहसील कार्यालयावर दिनांक 24 जून रोजी महामोर्चा काढण्यात आला. यावेळी हजारो मोर्चाकरी सहभागी झाले होते मोर्चेकर्यानी तहसील कार्यालया समोर तीन तास ठिय्या आंदोलन करून संबंधित अधिकारी यांना घेरावो आंदोलन केले. सदरील मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासुन ते शहरातील मुख्य मार्गाने काढण्यात आला या मोर्चात दहा हजार शेतकरी, निराधार महिला सहभागी झाले होते. या मोर्चा चे नेतृत्व शिवसेनेचे जिल्हा समन्वयक दशरथराव लोहबंदे यांनी केले यावेळी शिवसेनेचे एकनाथ पवार, मा.जि.प.अध्यक्ष दिलीपराव पाटील बेटमोगरेकर ,शिवसेनेचे मा.जि.प.सदस्य संतोष राठोड,संविधान रक्षक कृती समितीचे अध्यक्ष शंकर पवार काँग्रेसचे




राज्य सरचिटणीस डॉक्टर श्रावण रँपनवाड,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजू पाटील रावनगावकर,शिवाजी गेडेवाड,जनाबाई नाकाडे मधुकर महाराज बारूळकर, रामराव महाराज भाटेगावकर ,राहुल लोहबंदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती मुखेड तालुका हा डोंगराळ भाग असून शेतकऱ्यांना खरीप पिकावरच अवलंबून राहावे लागते मुखेड तालुक्यातील लोकप्रतिनिधीच्या उदासीतेमुळे मुखेड तालुक्याचा विकास खुंटला आहे गोरगरिबाच्या हाताला लोहबंदे यांच्या नेतृत्वाखाली हजारो लोकांचा मोर्चा तहसील कार्यालयावर काढण्यात आला यावेळी मोर्चे करण्यानी विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालया समोर तीन तास ठिय्या आंदोलन करुन तहसीलदार सह संबंधित अधिकारी यांना घेरावो घालून जाब विचारले या मोर्चाला शिवसेनेचे एकनाथ पवार, दशरथराव लोहबंदे, शिवाजी गेडेवाड,शंकर पवार, दिलीप पाटील बेटमोगरेकर, मधुकर महाराज, रामराव महाराज यांनी संबोधित केले दरम्यान मागण्या मान्य नाही झाल्यास संविधान क्रती समीतीच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. मोर्चा यशस्वी होण्यासाठी सरपंच बापुराव कांबळे जुनेकर राहुल लोहबंदे, अशितोष कांबळे, गंगाधर सोंडारे,रियाज शेख,अनिल कांबळे यांच्यासह आनेकांनी परिश्रम घेतले.



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे काम जलदगतीने करा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदूमिल येथील आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम जलदगतीने करण्यात यावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (सचिन खरात) वतीने करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले. वर्षभरापासून दादर येथे डॉ. आंबेडकरांच्या स्मारकाचे काम रखडले आहे. स्मारकाच्या कामाचा आढावा घेणाऱ्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (एमएमआरडीए) बैठकच झाली नाही. त्यामुळे कंत्राटदाराकडून स्मारकाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. स्मारकासाठी सुमारे १००० कोटी रुपये खर्च येणार असून, आतापर्यंत केवळ ३६५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हे स्मारक २०२४ साली पूर्ण होणार होते. मात्र, आतापर्यंत स्मारकाचा केंद्रबिंदू असलेल्या ४५० फूट पुतळ्यापैकी केवळ ९० फुटांचे काम झाले. जलद गतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी वितरित करून सन २०२५ पर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करण्यात यावे, या मागणीचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (सचिन खरात) जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आले आहे. यावेळी पवन पवार आकाश साबळे उपस्थित होते.

# बीडमध्ये लाखोंच्या संख्येने मराठे एकवटणार

## ११ जुलैला मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत शांतता रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** मराठा सम राजाच्या मागच्या सरकार दरबारी प्रलंबित असून मनोज जराणे बानी सुरु केलेला लढा अजून सुद्धा सुरुच आहे. सरकारला १३ जुलै पर्यंत वेळ दिल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाड्यात शांतता रीन्याचे आयोजन केले आहे. बीड शहरात ११ जुलैला भव्य दिव्य शांतता रॅली काढण्यात येणार आहे. बाच्च अनुषगाने आज (ता. २३) शहरातील सुर्या लॉन्स येथे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्ह्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही रॅली विश्वरत्न डा. बाबासाहेब अबिडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी असणार आहे. या रॅलीचा समारोप मनोज जरागे पाटील यांच्या जाहिर सभेने छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे होणार आहे.
लोकसभा निवडणूकीनंतर मराठवाड्यातील वातावरण दुषित बनले आहे. निवडणूका संपल्या तरी येथील तणाव आहे तशाच असल्याचे दिसत आहे. त्यात मराठा समाजाच्या मुख्य मागण्या सरकार दरबारी प्रलंबित आहेत. याच अनुषंगाने मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेला लढा अजून सुद्धा सुरुच आहे. मराठवाड्यात मनोज जरांगे पाटील यांनी आठही जिल्ह्यात शांतता रॅलीचे आयोजन केले आहे. बीड मध्ये ११ जुलैला भव्य दिव्य अशी शांतता रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी असणार आहे. या रॅलीत जिल्ह्यातील लाखो मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथे रॅलीचा समारोप मनोज जरांगे पाटील यांच्या जाहिर सभेने होणार आहे. याच अनुषंगाने आज बीड मध्ये नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्हाभरातून मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते. मराठा आरक्षणासाठी ज्यांनी राज्यभरातील मराठा समाज एकत्र केला असे मनोज जरागे पाटील है बीड मध्ये होत असलेल्या शांतता रॅलीत सहभागी होणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्यामाठी ओपन यहुन ठेवण्यात येणार आहे. या व्हॅन मध्ये फक्त मनोज जरागे पाटील असणार आहेत.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# काशी डोंगरावर वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठान उरण आणि महाराष्ट्र गुन्हे तपास साप्ताहिकचे पत्रकारांतर्फे उरण तालुक्यातील पिरकोन येथील काशी डोंगरावर वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न झाला आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र गुन्हे तपास साप्ताहिकचे पत्रकार सदस्य आणि सदाबहार दोस्ती ग्रुपचे सर्व सदस्य तसेच सारडे विकास मंच आणि ऑक्सिजन पार्कचे निर्माते नागेंद्र म्हात्रे,पिरकोन गावचे निसर्गप्रेमी विनायक गावंड, नवघर गावचे गड प्रेमी गणेश भोईर, तसेच नंदाई प्रतिष्ठान वशेनीचे डॉक्टर हिराचंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ उरण तालुका अध्यक्ष कैलास पाटील तसेच महाराष्ट्र गुन्हे तपास साप्ताहिकचे पत्रकार सदस्य तुकाराम गावंड, कामेश्वर म्हात्रे, संतोष जोशी, हरीचंद्र म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, सचिन पाटील, अरुण म्हात्रे, विजय गावंड या सर्वांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

# काँग्रेसच्या खोट्या प्रचारावर मात; मोदींचा विजयी शंखनाद!

## सुधीर मुनगंटीवार यांनी विजय उत्सवात व्यक्त केल्या भावना

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मोदी पंतप्रधान होऊ नयेत यासाठी पाकिस्तानमध्ये लोक प्रार्थना करत होते. भारतातही काही लोक मुस्लीम, आदिवासी बांधवांमध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते. काँग्रेसने खोट्या प्रचाराच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. याच खोट्या प्रचाराच्या आधारावर काँग्रेसने देशात काही जागा जिंकल्या. पण काँग्रेसच्या गेल्या तीन निवडणुकांची बेरीजही २४० होत नाही. उलट जनतेने पुन्हा एकदा देशगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वातील भाजप आणि मित्र पक्षांना पूर्ण बहुमत दिले. मोदी सरकारचा हा विजयी शंखनाद देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारच्या सलग तिसऱ्या विजयानिमित्त उत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुनगंटीवार बोलत होते. या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते चंदनसिंग चंदेल, भाजपचे जिल्हाध्यक्ष हरिष शर्मा, भाजप नेते शिवचंद द्विवेदी, काशीनाथ सिंह, रणंजय सिंग, शिवसेना नेते कमलेश शुक्ला, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राकेश सोमाणी, महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस विद्याताई देवाळकर, महिला अध्यक्ष वैशालीताई जोशी, बल्लारपूर नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल वाघ यांच्यासह नीलेश खरबडे, मनीष पांडे, देवेंद्र वाटकर, प्रदेश सदस्य रेणुकाताई दुधे, आशीष देवतळे, राजूभाई दारी यांची प्रमुख उपस्थिती होती. 'देशातील जनतेच्या मतदानरुपी आशीर्वादाने जननायक मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. ७.१२ मिनिटांनी पंतप्रधान मोदीजी राष्ट्रपती भवनात शपथ घेण्यासाठी पुढे जात होते तेव्हा मला ताडोबातील वाघाची आठवण आली. एखाद्या वाघाप्रमाणे ते भासत होते. आणि हा सोहळा प्रत्यक्ष अनुभवण्याचे भाग्य मला लाभले,' अशा भावना मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या. ते पुढे म्हणाले, 'सरकार स्थापन झाल्याबरोबर सर्वांत पहिले आणखी ३ कोटी गरिबांना घरे देण्याचा निर्णय एनडीए सरकारने घेतला. तिकडे काँग्रेसने प्रचारात महिलांना ८ हजार ५०० रुपये खटाखट देण्याच्या घोषणा



करून महिलांची फसवणुक केली. काही राज्यांमध्ये काँग्रेसने गॅरंटी कार्ड दिले. सरकार आले नाही तरी, आमचा खासदार निवडून आला तर आम्ही पैसे देऊ असे त्यात म्हटले. आता उत्तर प्रदेश, राजस्थानमध्ये जिथे काँग्रेसचे खासदार आले तिथे महिला फॉर्म ( गॅरंटी गार्ड )घेऊन पोहोचत आहेत आणि काँग्रेस नेते गायब आहेत. काँग्रेसचा हा खोटा चेहरा पुन्हा एकदा लोकांच्या पुढे आला'.भाजप सत्तेचे नाही सेवेचे राजकारण करते. त्यामुळे जेव्हा जेव्हा बल्लारपूरच्या जनतेने मला विधानसभेत पाठवले मी सेवेचा उद्देश ठेवला. कधी जात-पात-धर्म बघितला नाही. मदतीसाठी कुणी आला तर त्याचे काम बघितले. आताही नव्या ऊर्जेने कामाला लागणार आहे. गरिबांसाठी घरे, मालकी हक्काचे पट्टे अशा अनेक अपूर्ण विकासकामांना पूर्ण करणार आहे, असा निर्धारही मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. ज्या ४ लाख ५६ हजार मतदारांनी जातीचे राजकारण, आरक्षणाच्या अफवांकडे दुर्लक्ष करून मला मतदान केले त्यांचे मी आभार मानतो. महायुतीच्याही सर्व नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे मी आभार मानतो. कारण आपण एक कुटुंब होऊन लढलो आहोत, अशा भावनाही ना. श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या. विजयी उत्सव सभेपूर्वी बल्लारपूर शहरातील राणी लक्ष्मीबाई वॉर्ड येथे नागरी आरोग्य सुविधा केंद्र इमारतीच्या नूतनीकरणाच्या कामाचे ना. श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. हे काम जिल्हा स्तरावरील नगरोत्थान योजनेतून २२ लक्ष रुपये खर्चातून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच बल्लारपूर नगरपरिषद अग्निशमन विभागाला जिल्हा अग्निशमन योजनेतून मिळालेल्या अग्निशमन वाहनाचेही यावेळी लोकार्पण झाले. हे वाहन अरुंद गल्लीबोळातून जाण्यास सक्षम असल्याने आणीबाणीच्या प्रसंगी उपयुक्त ठरणार आहे.

**टायगर अभी जिंदा है :**निवडणूक जिंकून संसदेत गेलो असतो तर रेल्वे कोचचा कारखाना चंद्रपुरात आणण्याचा संकल्प होता. बल्लारपूर ते मुंबई व पुणे अशी थेट गाडी सुरू करण्याची मागणी करण्याचा संकल्प होता. मूर्ती येथील रखडलेले विमानतळ पूर्ण करण्याचा संकल्प होता. अशा अनेक गोष्टींचा विचार केला होता. पण मुनगंटीवार खूप काम करतात त्यांना थोडी आरामाची गरज आहे, असा विचार जनतेने केला असेल. पण जनतेच्या कामासाठी मला फरक पडत नाही कारण 'टायगर अभी जिंदा है', असेही ते म्हणाले.

**मी थकणारा आणि थांबणारा नाही :** लोकांचे प्रेम आजही कायम आहे. याच प्रेमाची ऊर्जा घेऊन काम करायचे आहे. ही निवडणूक विकासाच्या आधारावर नाही तर जातीच्या आधारावर झाली आहे. ही धोक्याची घंटा आहे. समाजात राजकीय कॅन्सर पसरण्याचे संकेत आहेत. या कॅन्सरचा समूळ नायनाट करून विकास करायचा आहे. पुन्हा एकदा शक्तीने काम सुरू करायचे आहे. मी थकलो नाही आणि थांबलोही नाही. शेवटच्या श्वासापर्यंत जनतेचे काम करायचे आहे, असेही मुनगंटीवार म्हणाले.

# दिंड्यांना वीस हजार रुपये अनुदान म्हणजे वारकऱ्यांचा अपमान : रोहिदास चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** यंदा महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी जी आषाढी एकादशी निमित्त वारीमध्ये सहभागी होणाऱ्या दिंड्यांना वीस हजार रुपयांचे जे अनूदान देण्याची जी घोषणा केली ती घोषणा म्हणजे तमाम वारकऱ्यांचा अपमान असल्याचे रोहिदास चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना आपले मत व्यक्त केले.

पुढे बोलताना वारकरी रोहिदास चव्हाण म्हणाले की, वारकऱ्यांच्या सेवेसाठी अनेक दिग्गज,दानशूर मंडळी दरवर्षी वारीत लाखो भाविकांवर लाखो करोडो रुपये खर्च करतात.त्यात अन्नदान, मोफत पाणीपुरवठा, मोफत रुग्णसेवा , फळ वाटप तरीही याची वाच्यता कुठेही करत नाहीत परंतु अधिकृत, नोंदणीकृत आषाढी वारीतील असलेल्या दिंड्यांना वीस हजाराच्या अनुदानाची घोषणा करून तमाम वारकरी संप्रदायाचा वारकऱ्यांचा अवमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे केला असल्याचे ते म्हणाले. भागवत तथा वारकरी संप्रदायातील रोहिदास चव्हाण हे १९८० पासूनचे वारकरी.आजतागायत न चुकता मनोभावे आषाढी वारीतील दिंडीत अजूनही सपत्नीक सहभागी होऊन विठ्ठल नामात तल्लीन होतात.अन्नदान करतात, वारकऱ्यांची सेवा ही देण त्यांना पुर्वी पासुनच वडील कै.खोब्राजी पाटील चव्हाण यांच्या असलेल्या विठ्ठल भक्ती मुळे, संस्कारामुळे, सुसंस्कृत घराण्यामुळे,वडीलोपार्जित शिकवणी मुळे असल्याचे दिसून येते. अजूनही ते वारकऱ्यांना जपतात, मदतीचा हात पुढे करतात, वर्षभरात सप्ताह, किर्तन, पोथी, शक्ती,आरती विविध धार्मिक कार्यक्रमात सहभाग नोंदवतात.समाजसेवा,भगवंताची सेवा, नाही रे वाल्यांची सेवा हे त्यांचे विशेष होय.

तसेच मुख्यमंत्र्यांची घोषणा म्हणजे तमाम वारकऱ्यांचा अवमान अशी प्रतिक्रिया उमटत असतानाच वारकरी असलेले रोहीदास चव्हाण यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या केलेल्या घोषणेचा आपल्या भावना व्यक्त करत तीव्र शब्दात संताप व्यक्त केला. मुख्यमंत्री शिंदे यांच्या अनुदानाच्या घोषणामुळे तमाम वारकरी संप्रदायात तीव्र पडसाद उमटत आहेत. सरकारचे काम हे जनतेला सुख सुविधा देणे त्यात रस्ते,पाणी, दिवाबत्ती, शौचालय आदी अत्यावश्यक बाबींचा पुरवठा करणे हे असून तसेच वारकऱ्यांना अत्यावश्यक सेवा देण्यात सरकार का हयगय करत आहे? असेही वारकरी रोहिदास चव्हाण पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

# लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील महावितरण कंपनीचे ३३ केव्ही उपकेंद्रातून मौजे देऊळगाव गुजरी व परिसरामध्ये गावांमध्ये गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून लाईट नसल्याने शेतकरी व ग्रामस्थ वैतागले होते म्हणून दि.२५.०६.२०२४ रोजीच्या आंदोलनाचा इशारा नितू ठाकूर माजी सरपंच देवळगाव गुजरी यांनी लेखी निवेदनात सिल्लोड सोयगाव येथे कार्यकारी अभियंता यांच्याकडे देण्यात आला होता.आंदोनाचा इशारा येताच महावितरणचे अधिकारी कर्मचारी खडबडून जागे झाले आणि दि. १३.०६.२०२४ रोजीचे प्राप्त पत्र प्राप्त होताच उपरोक्त आपल्या प्राप्त पत्रामध्ये नमूद १५ ते २० दिवसापासून मौजे देऊळगाव गुजरी व परिसरातील पळसखेडा, तोरनाळे, जुनोने, वसंतनगर, पहाड तांडा ता. जामनेर लाईट नसल्याबाबतचे निवेदन निम्न स्वाक्षरीकार यांना प्राप्त झाले असून त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर गावांना वीज पुरवठा सिल्लोड विभागातील सावळदबारा उपकेंद्राद्वारे (सोयगाव उपविभाग) करण्यात येतो. सदर बाबत आपणास कळविण्यात येते की, माहे एप्रिल २०२४ पासून ते आजपर्यंत सदर भागांमध्ये अनेक वेळा वादळी पाऊस, हवा इ. बाबींमुळे महावितरणचे साहित्य जसे की, विजेचे काम डीपी/ रोहित्रे, वीज तारा इ. नादुरुस्त होऊन वीज पुरवठ्या मध्ये खंड पडलेला आहे. सावळदबारा परिसर सोबतच देऊळगाव गुजरी, वसंतनगर, तोरनाळा आदी भागांमध्येही वीज खांब व तारा वादळात पडल्याने खंडित वीज पुरवठ्याच्या कालावधीमध्ये वाढ झालेली होती. हा भाग जामनेर तालुक्यामध्ये येत असल्याने त्याबाबत तेथील अधिकारी/कर्मचारी यांनी सदर बाबत कार्यवाही करणे अपेक्षित आहे.तसेच सावळदबारा उपकेंद्राची मुख्य वाहिनी (३३ के.व्ही.) ही १३२ के.व्ही. मोताळा येथून कार्यान्वित असल्याने त्यासाठी बुलढाणा विभागाशी ३३ के. व्ही. वाहिनी नादुरुस्त झाल्यास संपर्क करावा लागतो. यामध्ये बराच कालावधी लागत असल्याने वीज पुरवठा सुरळीत होण्यास विलंब होतो. ३३ के.व्ही. सावळदबारा लाईनचे अंतर/ लांबी जास्त असल्याने यानंतर लाईन नादुरुस्त झाल्यावर त्याचे दुरुस्ती कामासाठी देऊळगाव शाखेच्या जनमित्र/कर्मचारी यांची मदत घेतली जाईल जेणेकरून दुरुस्तीचे काम तातडीने करून वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य होईल.आपल्या या सर्व बाबींची दखल घेऊन संबंधित उपविभाग व शाखा कार्यालय सावळदबारा यांना योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या असून वीज पुरवठा खंडित झाल्या नंतर तो तातडीने सुरळीत करण्यासाठी सर्वोपतरी प्रयत्न करून त्याची दखल घेणेबाबत आदेशित केलेले आहे.

# खा. शोभा बच्छाव यांचा संसदेत शपथविधी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोकसभा मतदारसंघाच्या काँग्रेसच्या खासदार डॉ.शोभा दिनेश बच्छाव यांनी भारतीय संसदेत मराठीतून शपथ घेतली . भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नेत्या तथा माजी मंत्री धुळे लोकसभा क्षेत्राच्या खासदार डॉक्टर शोभा दिनेश बच्छाव यांनी दि 25 जून 2024 रोजी भारतीय संसदेत पद व गोपनीयतेची शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर प्रतिक्रिया देताना डॉ.शोभा बच्छाव म्हणाल्या की धुळे लोकसभा क्षेत्रात जलसिंचनासह, मनमाड धुळे इंदोर रेल्वे मार्ग व इतर अनेक विकासाचे प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत या प्रकल्पांसाठी मंजुरी निधी मिळवणे या विविध कारणांसाठी संसदेत आवर्जून आवाज उठविणार व आगामी काळात विविध समस्या अडचणी यांच्याबाबत



संसदेत लढा देऊन न्याय मागण्या पदरात पाडून घेण्याची ग्वाही डॉक्टर शोभा बच्छाव यांनी दिली आहे. धुळे मतदार संघातल्या जनतेच्या अडीअडचणी समस्या सोडविण्यासाठी मी कटिबद्ध असल्याची ग्वाही खासदार शोभा बच्छाव यांनी दिली आहे.

# गडचिरोलीत नक्षलवाद्यांची चहूबाजूंनी कोंडी

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** दोन दिवसांपूर्वी नक्षल नेता गिरीधर याने पत्नीसह आत्मसमर्पण केल्याने नक्षलवादी चळवळीला हादरा बसल्याचे बोलल्या जात असताना गडचिरोलीतील आणखी पाच गावांनी नक्षलवाद्यांना प्रवेश बंदी केली आहे. त्यामुळे आधीच पोलिसांच्या नक्षलविरोधी अभियानामुळे शेवटची घटका मोजत असलेल्या या चळवळीची चांगलीच कोंडी झाल्याचे चित्र आहे. नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. २००३ पासून नक्षल गावबंदी योजना सुरू आहे. या योजनेच्या अनुषंगाने पोलीस दलामार्फत जनजागृती सुरू आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ देऊन हिंसक चळवळीकडे भरकटलेल्यांना पुन्हा विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आत्मसमर्पण योजनाही आहे. भामरागड तालुक्यातील लाहेरी उपपोलीस ठाणे हद्दीतील मोरडपार, आलदंडी, कोयर, गोपणार व मुरुंगल या पाच गावातील नागरिकांनी एकत्रितपणे येऊन नक्षल्यांना गावबंदी करून त्याबाबतचा ठराव पोलिसांना सादर केला. पाचही गावे जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असून नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या अबुझमाड परिसराच्या अगदी जवळ असल्याने या गावांमध्ये नक्षलवाद्यांचे वर्चस्व होते. आता लोकांमध्ये परिवर्तन होत असून हिंसक चळवळीला नकार देण्याची हिंमत दाखविली जात आहे. २०० भरमार बंदुका व सळ्या व स्फोटक वस्तूही पोलिसांकडे सोपविल्या आहेत. उपअधीक्षक अमर मोहिते, लाहेरी येथील प्रभारी अधिकारी संतोष काजळे, उपनिरीक्षक प्रशांत डगवार, सचिन सरकटे, आकाश पुयड व प्रभारी अधिकारी शरद काकळीज यांनी यासाठी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



# अभिनेत्री ईश्वर्याने घेतले साईंचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** जगाला श्रध्दा व सबुरीची शिकवण देणा-या शिर्डी येथील साईबाबाच्या समाधीच्या दर्शनासाठी दाक्षिणात्य अभिनेत्री ईश्वर्या मेनन यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. साईबाबाच्या दर्शनानंतर मेनन यांचा श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी साईची मुर्ती शाल देऊन सत्कार केला यावेळी साईबाबा संस्थानचे मंदिर प्रमुख विष्णू थोरात जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके आदी उपस्थित होते यावेळी बोलताना अभिनेत्री ईश्वर्या मेनन म्हणाल्या की साईच्या दर्शना मुळे मनाला मोठी मनशाती व समाधान मिळाल्याचे सांगत साईबाबा संस्थान साईभक्त भाविकांच्या सेवेसाठी राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

# साहित्यिक अय्युब पठाण यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रसिध्द साहित्यिक तथा बालभारतीच्या पाठय पुस्तकातील कवी अय्युब पठाण लोहगावकर यांना नुकताच ३२ वर्षांपासून मराठी साहित्य क्षेत्रामध्ये भरीव योगदान दिल्याबद्दल साहित्य क्षेत्रातील अत्यंत सन्मानाचा पुणे येथील साहित्यरत्न पुरस्कार मिळाल्याने अंगारक संकष्ट चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर बिडकीन येथील माऊली मेडीकलचे संचालक आनंद तिवारी आणि सिध्दार्थ साठे व राजू वंजारे यांना साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा पुष्पहार देऊन यथोचित सत्कार केला. साहित्यिक तथा बॅन्डमास्टर अय्युब पठाण यांनी मोठ्या संघर्षातून साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात आपली प्रतिमा तयार केली असून आता पर्यंत त्यांना विविध सेवाभावी संस्था व संघटना यांच्याकडून ५६ राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहे. या सत्काराबद्दल योगेश वाघ, मुख्याध्यापक शंकरराव वाघमोडे, दावलभाई शेख, संजय माने, जफरखाँ टेलर, इलियास शैख यांनी अय्युब पठाण यांचे अभिनंदन केले.





# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** तालुक्यातील चोळाखा येथील रहिवासी व धर्माबाद येथील प्रतिष्ठित व्यापारी रत्नाकर पाटील कदम यांनी गुरुवारी दि.१९ जून रोजी त्यांच्या आईच्या स्मरणार्थ व पत्नी सौ.अरूणा कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आपल्या गावातील जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. सौ.अरुणा रत्नाकर कदम यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चोळाखा येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, स्कूल बॅग,वर्षभर पुरेल एवढ्या वह्या,पेन,कंपास,पाण्याची बॉटल,चित्रकलेची वही,रंगपेटी,पेन्सिल,रबर, शॉर्पनर,कंपास पेटी विद्यार्थ्यांना बॅग तसेच शाळेला गॅस शेगडी, लेझीम ढोल ताशा, शैक्षणिक चार्ट बॅनर इत्यादी भेट दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे जीवन उंचावण्यासाठी आपल्या कर्मभूमीतील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढावे, विद्यार्थी गुणवान कसे होतील,यासाठी वर्षभर पुरेल एवढे सर्व साहित्याचे वाटप केले. सौ. अरुणा रत्नाकर पाटील,दत्ताहरी कदम,साईनाथ पाटील,आनंदपुरी महाराज,दीपक पाटील,गंगाधर कदम, बापूराव कदम, रामराव कदम,परशुराम कदम,दिलीप कदम,शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षाच्या सौ.कांताबाई कदम, ग्रामपंचायत सदस्य सौ.सिंधुताई कदम,मंजुषा कदम, धनराज विठ्ठल कदम,जारिकोट केंद्राचे केंद्रप्रमुख साईनाथ माळगे,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.वैशाली विवेक स्वामी,सहशिक्षक के.वाय पल्लेवार स्वयंपाकी सौ.शकुंतला कदम,मदतनीस लक्ष्मीबाई कदम या सर्वांच्या उपस्थितीत हा उपक्रम घेण्यात आला.

# सीओइपीयन्स अकॅडमीतील विद्यार्थ्यांचे यश

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** "शिका आपल्या मातृभाषेतूनच" हे ब्रीदवाक्य मनाशी बाळगून लोणंद ता.खंडाळा येथे COEPIAN'S (सीओइपीयन्स) अकॅडमी कार्यरत आहे.गेली दोन वर्षापासून या अकॅडमीत शिकणारे विद्यार्थी चांगले यश मिळवु लागलेले आहेत.नुकताच MHT-CET चा निकाल जाहिर झाला.या परीक्षेतून सुद्धा विद्यार्थ्यांनी घवघवीत असे यश मिळविले.शिवांजली शिंदे या विद्यार्थिनीने PCM या ग्रुप मध्ये ९९.४७% मिळवून संपूर्ण खंडाळा तालुक्यात प्रथम क्रमांकाला गवसणी घातली आहे.तसेच PCB या ग्रुप मध्ये देखील तिने ९९.३५% एवढे गुण मिळवले आहेत.बारावी बोर्ड प्रमाणे MHT-CET मध्ये सुद्धा विद्यार्थी यश मिळवित असल्याने COEPIAN'S (सीओइपीयन्स) अकॅडमीत शिकविणारे शिक्षक सुद्धा विशेष समाधान व्यक्त करत आहेत.तसेच पालकांकडून कौतुक केले जात आहे. दोन वर्षांच्या कालावधीत संपूर्ण तालुक्यात नं.१ रिझल्ट देणारी अकॅडमी ठरली आहे.असा विश्वास अकॅडमीकडून व्यक्त केला जात आहे.बी.एस. सी नर्सिंग सीईटी च्या परीक्षेत सुद्धा COEPIAN'S (सीओइपीयन्स) अकॅडमीची अमृता क्षीरसागर हिने देखील ९९.५५% एवढे गुण मिळवून खंडाळा तालुक्यात प्रथम आली आहे. अमृता क्षीरसागर हिने PCB च्या ग्रुप मध्ये ९८.१९% आणि PCM या ग्रुप मध्ये ९४.७९% एवढे गुण मिळविले आहेत. PCM या ग्रुप मधून अनुष्का घोडके (९७.४८%),मयुर चव्हाण (९७.२१%),श्रेयस शेळके (९६.३५%),प्रेरणा गोसावी (९६.३४%),स्नेहा वगरे (९३.११% ),मिनल राठोड (९२.८८% ),प्रगती गायकवाड (९२.३३% ),वैष्णवी ठोंबरे (९२.१९%),विनीत फासगे (९०.८९% ) आदी विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळविले आहेत.तसेच प्रेरणा गोसावी या विद्यार्थीनीने PCB ग्रुप मध्ये ९६.१६% इतके गुण प्राप्त केलेले आहेत.बारावी बोर्ड परीक्षेत सुद्धा COEPIAN'S(सीओइपीयन्स) अकॅडमीच्या शिवांजली शिंदे हिने ९३% गुण मिळवित खंडाळा तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला होता.अमृता क्षीरसागर (९०.५०%), प्रेरणा गोसावी (८६.५०%),श्रेयस शेळके (८६.५०), अनुष्का घोडके(८५.००%),स्नेहा वगरे ८५.००%),आणि मीनल राठोड (८२.००%) आदींनी विद्यार्थ्यांनी गौरवास्पद यश मिळविले. COEPIAN'S (सीओइपीयन्स) अकॅडमी सुरू होऊन दोन वर्ष झालेली असून या दोन वर्षाच्या कालावधीत पहिल्यांदाच न भुतो असा निकाल लागला असल्याचे COEPIAN'S (सीओइपीयन्स) अकॅडमीच्या प्रमुखांनी सांगितले.अगदी कमीत कमी शुल्का मध्ये लोणंद शहरात COEPIAN'S (सीओइपीयन्स) अकॅडमी ही शालेय विद्यार्थ्यांसाठी यशवंत करणारी करणारी अकॅडमी बनलेली आहे.ग्रामीण भागातील तसेच शेतकरी व सामान्य कुटुंबातील मुलांसाठी कमीतकमी शुल्का मध्ये जेईई मेन्स/नीट/एमएचटी-सीईटी यांसारखे उच्च दर्जाचे शिक्षण लोणंद सारख्या ग्रामीण भागामध्ये देऊन विद्यार्थी घडवत आहेत.परीक्षेतून या अकॅडमीतीतल विद्यार्थ्यांचे यश संपूर्ण खंडाळा तालुक्यात चर्चेचे येत असल्याने ही अभिमानास्पद गोष्ट असल्याचे प्रमुख अमित सोनवणे यांनी सांगितले.

# बाजार सावंगी -इंदापूर - बोडखा रस्त्यावर वाहनधारकांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी ते इंदापूर बोडखा पर्यंत ठिकठिकाणी अपुर्ण पुल कामे व पडत असलेल्या पावसामुळे तात्पुरत्या रस्त्यातून ये जा करताना वाहनधारकांचे हालचहाल होत असल्याचे चित्र आहे. संथ गतीने काम, कामांत चालढकल, अनियमितता यामुळे पुल कामे अपूर्ण असुण जुन मृग नक्षत्राच्या पावसामुळे व आता आर्द्रा नक्षत्राच्या पावसाने आधुनमधुन फटकेबाजी सुरु ठेवल्याने पुल कामा साठी तात्पुरते (डायव्हर्ट) कच्चे रस्त्यामुळे पाऊस पडताच चिखल होवून ये जा साठी त्रासदायकच ठरत आहे. पावसाळ्यात सुरु असलेले पुल कामामुळे वाहनधारकांना तात्पुरत्या रस्त्यातून चिखल ओलावा पाण्यामुळे सरकंडी पडझड हालचहाल सुरू आहे. सर्व पुल कामे सार्वजनिक बांधकाम विभाग खुलताबाद अंतर्गत असुण ठेकेदाराला तात्पुरता कच्च्या रस्त्यावर मुरुम टाकण्याची सुचना विभागांकडून असली तरी पावसामुळे रस्ता सतत कच्च होवून चिखलमय होत असल्याने हालचहाल परिसरात वडगाव सावंगी येथील नागरिकांचे हाल होत आहेत.



# उपोषणकर्त्यांकडे शासनाच्या अधिकाऱ्यांनी फिरवली पाठ

## जलजीवनच्या बोगस कामासाठी उपोषण दखल घेण्यास टाळाटाळ

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**मुखेड :** तालुक्यातील मौ. खतगाव (प.दे) येथील जलजीवन मिशन योजने अंतर्गत होत असलेल्या पाणी पुरवठा योजनेचे इस्टीमेट प्रमाणे काम न होता बोगस काम गुत्तेदार करीत आहेत या प्रकरणाची सखोल चौकशी करून गुत्तेदार यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करणे दि.05/04/2024 रोजी दिलेल्या पत्राची कसल्याच प्रकारची चौकशी व कार्यवाही करण्यात आली नाही. म्हणून दि. २४ जानेवारी रोजी पाणी पुरवठा विभाग कार्यालय मुखेड समोर आमरण उपोषण चालू असुन उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे.

मौ. खतगाव (प.दे) येथील जलजीवन मिशन योजने अंतर्गत चालू असलेले काम थातुरमातुर करून बिले उचलण्याचे षडयंत्र गुत्तेदार यांनी करीत असल्याचे दिसून येत आहे. इस्टीमेट प्रमाणे काम न करता आपल्या मर्जीप्रमाणे काम करण्यात येत आहे. पाईपलाईन तीन फुटाऐवजी एक फुटावर टाकून चांगले रस्ते खोदून त्यांच्यावर थातूरमातुर माल टाकून हे रस्ते खराब करून त्या रस्त्यात माळ व्यवस्थित न तक्ता थातूरमातुर रस्ते दुरुस्त करत आहेत. संबंधित कामाविषयी गुत्तेदार यांच्याशी विचारपूस केली असता आम्हीं आमच्या मर्जीप्रमाणे काम करतो, तुम्हाला काय करायचे ते करा, तुम्ही माझं काही करू शकत नाही अशी भाषा वापरत आहेत.

सदरील कामामध्ये नळ योजना फ्रीवेल ऐवजी साधे बसविले, जुने पाईप टाकले आहेत, वाल साधे टाकले आणि 6 KG पाईप ऐवजी 4 KG वापरलेले आहेत. या प्रकरणातील सर्व चौकशी करण्यासंबंधी आपल्या कार्यालयास रीतसर लेखी तक्रार दिली असून त्या लेखी तक्रार पत्राची आपल्या कार्यालयाकडून कसलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. जल जीवन मिशन अंतर्गत होत असलेले पाणी पुरवठाचे कामे हे निकृष्ट दर्जाचे होत आहेत तसेच अर्धवट नळजोडणी झाली कुठे झालीच नाही कामाबाबत विचारपूस केली तर गुत्तेदार दादागिरीची भाषा वापरतो व संबंधित पाणीपुरवठा उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन ही ह्याची दखल घेत नाही किंवा तपासणी करण्यात येत नाही त्यामुळे पाणी पुरवठा उपविभागीय कार्यालय पंचायत समिती मुखेड येथे दोन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेले गोविंद हुल्लाजी गायकवाड तसेच भीम टायगर भगवान दादा गायकवाड खतगावकर, संतोष कांबळे, वैभव पवार, मारोती सोनकांबळे,प्रकाश सोनकांबळे, धोंडीबा सोनकांबळे, व्यंकट सोनकांबळे , भुजंग कांबळे, बाबुराव कांबळे तसेच माजी सरपंच मारोती पाटील राजूरे आदीचा उपोषणाला पाठिंबा दिला आहे.




# शैलजा खरात संघटक सचिवपदी नियुक्त

## महिलांसाठी काम करत राहणार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राजकारणासोबत सामाजिक कार्यात मोठे योगदान देणाऱ्या खंडाळा तालुक्यातील लोणंद नगरीच्या माजी नगरसेविका शैलजा बाबासाहेब खरात यांची नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातून "महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव पदी" नेमणूक करण्यात आलेली असून या निवडी बद्दल त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.पुणे येथे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे, आमदार व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, महिला अध्यक्षा रोहिणी खडसे, कविता म्हेत्रे, वाई महाबळेश्वर खंडाळा विधानसभा अध्यक्ष डॉ.नितीन सावंत,जिल्हाध्यक्ष आशा भिसे ,संजना जगदाळे आदींसह सर्व राज्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये यशस्वीनीचा कार्यक्रम व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली होती.या कार्यक्रमातून निवडी जाहीर करण्यात आल्या.नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

यावेळी लोणंद ता.खंडाळा येथील शैलजा खरात यांची प्रदेशस्तरावर पक्षाच्या संघटक सचिव पदी नियुक्ती करण्यात आली.या निवडीबद्दल लोणंद सह सातारा जिल्ह्यातून त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात येऊ लागले आहे.माजी खासदार श्रीनिवास पाटील,आ.शशिकांत शिंदे, डॉ.नितीन सावंत, दयाभाऊ खरात,हेमंत आप्पा पवार, दीपक जाधव, उमेश धायगुडे, पानसरे,राजाभाऊ खरात, शशिकांत खरात, आतिश खरात, दत्तात्रय खरात, संतोष खरात, ॲड. अमित खरात,योगेश खरात, ॲड.विलायत मणेर,संजना जगदाळे,मोहिनी मिसाळ,मालन चव्हाण आदी सह इतरांनी त्यांचे अभिनंदन केले.या निवडी बद्दल शैलजा खरात यांनी विशेष समाधान व्यक्त केले.शैलजा खरात म्हणाल्या की,आपण केलेल्या कामाची पोचपावती आपल्याला मिळाली आहे.यापुढे आपण महिलांसाठी असेच काम करत राहणार आहे.महिलांचे सक्षमीकरण व सबलीकरण करणार आहे. या पदाचा योग्य ठिकाणी योग्य वेळी वापर करणार आहे. विशेष करून पक्ष वाढी साठी व महिलांचे संघटन वाढीसाठी या पदाच्या माध्यमातून विशेष मेहनत घेणार आहे.असे सुध्दा त्यांनी सांगितले.शैलजा खरात यांनी राजकारणासोबतच सामाजिक कार्याची सुद्धा बांधिलकी जपलेली आहे.गेली अनेक वर्षापासून त्या राजकारणाबरोबर समाजकारणात सुद्धा सक्रिय आहेत.यापूर्वी त्यांनी अनेक पदे भूषविलेली आहेत. काँग्रेस मध्ये असताना त्यांनी खंडाळा तालुकाध्यक्ष म्हणून सुद्धा जबाबदारी पेललेली आहे.आज त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार या पक्षात असून त्या पक्षवाढी सोबतच महिला संघटन करण्यावर विशेष भर देत आहेत.नुकत्याच संपन्न झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मोठी प्रचार यंत्रणा राबविली होती.वाई खंडाळा महाबळेश्वर या मतदारसंघातून त्यांनी सुद्धा ठीक ठिकाणी प्रचार केला.आगामी विधानसभेच्या निवडणूकीत सुद्धा मोठ्या ताकतीने आमचा पक्ष लढणार असल्याचे शैलजा खरात यांनी सांगितले.खरात कुटुंबातील महिला प्रदेश स्तरावरील पदावर विराजमान झाल्या बद्दल सर्व खरात समाजाला या गोष्टीचा सार्थ अभिमान वाटत असल्याच्या भावना सुद्धा व्यक्त करण्यात आलेल्या आहेत. आजपर्यंत मिळालेली अनेक पदे यशस्वीपणे पदे गाजवली असून तळागाळातील लोकांपर्यंत आपले संघटन कौशल्य वाढवत लोणंद पंचक्रोशीमध्ये एक चांगला ठसा उमटवून नावलौकिक प्राप्त केला असा भाव व्यक्त करत समस्त खरात हितकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी शैलजा खरात यांचा सत्कार केला.





आधुनिक केसरी

**प्रा. लक्ष्मण हाके यांनी केलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ पाडेगाव, ता. खंडाळा येथे कँडल मार्च काढण्यात आला. यावेळी महिला पुरुष मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. ओबीसी एकतेचा विजय असो, एकच पर्व, ओबीसी सर्व असा नारा देण्यात आला. 'लक्ष्मण हाके तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है' असा जयघोष ही करण्यात आला.**
**छाया : सुशिल गायकवाड**

# प्रेमविवाह केलेल्या प्रेमिकेस पतीराजाकडे केले सुपूर्त!

आधुनिक केसरी न्यूज

**शिरढोण :** कळंब तालुक्यातील एकाच गावातून लागोपाठ दोन दिवसांमध्येच तिघेजण बेपत्ता झाल्याची घटना घडली होती. सदरील गावातील एक 23 वर्षीय महिला दिनांक 6 जून रोजी सकाळी नवऱ्यासोबत किरकोळ वाद झाल्यामुळे घरात कोणालाही न सांगता तिच्या सहा वर्षीय मुलासह बेपत्ता झाली होती. याबाबत सदरील महिलेच्या पतीने शिराढोण पोलीस ठाण्यामध्ये मिसिंगची तक्रार दिली होती. त्याचबरोबर याच गावातील एक 19 वर्षीय तरुणही दिनांक सात जून रोजी घरी न सांगता बेपत्ता झाली होती. त्यांची ही तक्रार शिराढोण पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. दोन दिवसांमध्ये एकाच गावांमधून एक महिला व एक तरुण अचानक गायब झाल्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य ओळखून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिराढोण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याण नेहरकर यांनी कर्मचारी परमेश्वर मेगले व मनोज मरलापल्ले यांचे पथक तयार करून त्यांच्याकडे तपास सोपवण्यात आला. या पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे पुणे येथे जाऊन शोध घेत दिनांक 23 रोजी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून त्यांना ताब्यात घेण्यात आले.

अवघ्या पंधरा दिवसांमध्येच शिराढोण पोलिसांनी दोन्हीही बेपत्ता प्रकरणाचे गुढ उघडले व गायब झालेली महिला व तिच्या मुलासह तरुणीलाही परत आणून कुटुंबियाकडे सोपवले. बेपत्ता प्रकरणातील 19 वर्षीय तरुणी ही पुण्यातच आढळून आली. तिला पोलिसांनी परत शिराढोण पोलीस ठाण्यामध्ये आणल्यानंतर तिला विचारले असता त्या तरुणीने वाशी तालुक्यातील एका तरुणासोबत प्रेमाविवाह केल्याचे स्पष्ट झाले. तिने पतीसोबत राहण्याची इच्छा पोलिसाकडे व्यक्त केल्यामुळे व तरुणी सज्ञात असल्यामुळे पोलिसांनी सदरील तरुणीला तिच्या पतीच्या स्वाधीन केले.

# महिन्याभरापासून आधार दुरूस्ती काम रखडले

## भोकर डाक कार्यालयातील प्रकार : ग्राहकांची गैरसोय

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सध्या बहुतांशी शासकीय कार्यालयातील कामे संगणकावर अवलंबून असल्याने सर्व कार्यालयात संगणकाची व्यवस्था करण्यात आली आहे. मागील महिन्याभरा पासून शहरातील डाक विभागातील संगणक बंद झाल्याने आधारकार्ड दूरूस्तीसह अन्य कामे ठप्प झाली आहेत.ग्राहकांची गैरसोय होत असल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.सबंधीत वरीष्ठानी याकडे लक्ष देऊन होणारी गैरसोय दूर करावी अशी ग्राहकांची मागणी जोर धरू लागली आहे

पूर्वी भारतीय डाक विभाग सेवा हि अत्यावश्यक सेवा म्हणून ओळखली जात होती.तार, पोस्टकार्ड,आंतरदेशी पत्रामूळे संवाद साधला जात होता.दरम्यान खासगी "कुरीअर" सेवा सूरू झाली अन् डाक विभागाला त्याचा मोठा फटका सहन करावा लागला. हळूहळू डाक विभागाने तंत्रज्ञानाचा वापर सुरू करून डाक विभागास गतवैभव प्राप्त करून देण्यास यशस्वी झाले आहेत. विविध योजना,आंतरराष्ट्रीय बँकेत मिळणाऱ्या सुविधा आता डाक कार्यालयात मिळुन लागल्याने ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

> डाक विभागात बहू तांशी कामे संगणकावर केली जात असल्याने ग्राहकांची नेहमी गर्दी होत आहे .मागील महिन्याभरापासून शहरातील डाक विभागातील संगणक बंद झाल्याने आधारकार्ड दूरूस्तीसह अन्य कामे खोळंबली आहेत . वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे कानाडोळा केल्याने ग्राहकांची हेळसांड होत आहे .संबधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन ग्राहकांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे . महिन्यापासुन आमच्या कार्यालयातील संगणक बंद झाल्याने वरिष्ठांकडे यांची लेखी महिती पाठवली आहे . लवकरच यावर तोडगा काढला जाईल . ग्राहकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी आम्ही काळजी घेत आहोत .
> **कैलास पाटील : पोस्टमास्तर, भोकर**